|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : २० सोमवार दि. १३ मे २०२४ ते रविवार दि. १९ मे २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पतीवरच्या रागामुळे माता वैरीणी झाली दोन मुलांचा जीव घेऊन आत्महत्या केली

नाशिक/क्राईम रिपोर्टर

तणावात असलेला माणूस कधी कधी इतका आऊट ऑफ कंट्रोल होतो की आपल्याच कुटुंबातील व्यक्तीवरचा राग दुसऱ्यावर काढताना नात्या गोत्याचा सुद्धा विचार करीत नाही. नाशिकमध्ये अशाच एका भयंकर घटनेत पती-पत्नी मधील भांडण दोन चिमुकल्यांच्या प्राणावर बेतले. पत्नीने पतीवरच्या रागामुळे पोटच्या दोन मुलांना विष पाजून मारले आणि नंतर स्वतःही इमारतीवरून खाली उडी टाकून आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण नाशिक हादरले असून ...पान २ वर

# पालघरच्या तिरंगी लढतीत भूमिपुत्र निर्णायक ठरणार नरेंद्र मोदींच्या गॅरंटीची इथे जराही डाळ नाही शिजणार






पालघर/वरिष्ठ प्रतिनिधी

भाजपने या देशातील जनतेला आपले गुलाम समजून गृहीत धरलेले आहे. त्यामुळे कुठल्याही दगडाला शेंदूर फासून कुठेही उभे करायचे आणि मोदींच्या नावावर तो निवडून येईल अशी खात्री बाळगायची असे सध्या भाजपत सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून पालघर मतदार संघात दिवंगत माजी मंत्री विष्णू सावरा यांचे चिरंजीव डॉ. हेमंत सावरा यांना भाजपने तिकीट दिले आहे. आता हेमंत सावरा हे केवळ विष्णू सवरांचे चिरंजीव म्हणून त्यांना निवडून द्यायचे का? या हेमंत सावरा यांचे पालघर जिल्ह्यासाठी काय योगदान आहे. नेहमी घरणेशाहीवर बोलणाऱ्या मोदींना ही घराणेशाही दिसत नाही का? मुळात वाढवणं बंदरामुळे अर्धा पालघर जिल्हा भाजपचा विरोधात गेला आहे. तर दुसरीकडे हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीची इथे जबरदस्त अशी संघटनात्मक ताकत आहे. त्यांचा उमेदवार पालघर लोकसभा मतदार संघातील बोईसर विधानसभेचा आमदार आहे. त्यामुळे इथे आपली डाळ शिजणार नाही हे भाजपा नेतृत्वाच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी सिटिंग खासदार राजेंद्र गावीतांना डावलून डॉ. हेमंत सावरा यांना बळीचा बकरा बनवला आहे. त्यामुळे खरी लढत महाविकास आघाडीच्या भारती कामडी व बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील यांच्यातच आहे. याचे आणखी एक कारण भाजपने शिवसेना फोडल्याचा राग लोकांच्या मनात आहे, तर गावीत इथल्या शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता गुपचूप भाजपात गेले. त्यामुळे शिंदे गटाचे कार्यकर्ते ना गावितांचे ऐकणार ना हेमंत सावरांच्या पाठीशी उभे राहणार. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इथे निवडणूक संपेपर्यंत जरी मुक्काम केला तरी भाजपचा उमेदवार येथून निवडून येऊ शकत नाही. त्यामुळे या मतदार संघात बविआच्या राजेश पाटील यांचेच पारडे जेड आहे.

आदिवासी बहुल जिल्हा अशी ओळख असलेल्या पालघर मतदार संघात यंदा तिरंगी लढत आहे. बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील महायुतीचे डॉ. हेमंत सावरा व महविकास आघाडीच्या भारती कामडी या तिघांपैकी पालघरची जनता कोणाच्या पाठीशी उभी रहाणार हे २० मे रोजी होणाऱ्या मतदानानंतर ४ जूनला कळेल. ठाणे जिल्ह्याच्या विभाजनानंतर पालघर जिल्हा अस्तित्वात आला. जवळपास २१ लाख ४८ हजार ५१४ मतदार असलेल्या या जिल्ह्याचा अजूनही हवा तसा विकास झालेला नाही. आजही या जिल्ह्याच्या दुर्गम आदिवासी पाड्यांवर रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, रोजगार, परिवहन या सारख्या मूलभूत सुविधा नाहीत. विष्णू सावरा, चिंतामण वनगा, कृष्णा घोडा यांच्या सारखे सुटाबुटातले आदिवासी आमदार-खासदार मंत्री झाले. पण इथला आदिवासी मात्र तसाच फटाका तुटका राहिला याला कारणीभूत आहेत. केंद्र आणि राज्य सरकार या दोन्ही सरकारांनी ...पान २ वर

## अनैतिक संबंधात अडसर ठरला मोठा दिराच्या मदतीने पतीचा काढला काटा



मयत प्रमोद

अकोला/क्राईम रिपोर्टर

**दारूमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झालेत याची कितीतरी उदाहरणे समोर असतानाही लोक दारू सोडत नाहीत. त्यामुळे कधीकधी अशा दारुड्या लोकांचा त्याचे नातेवाईकच फायदा घेतात व त्याचा संसार उद्ध्वस्त करतात. अकोला जिल्ह्याच्या तुलंगा खुर्द गावात अशाच एका घटनेत पती दारू पितो म्हणून एका महिलेने दिराशी अनैतिक संबंध जुळवले. मात्र पतीचा अडसर ठरत असल्याने तिने दिराच्या मदतीने पतीचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी २४ तासात दोघांना अटक केली आहे.**





दारूने अनेक संसाराची वाताहत केली आहे, पण तरीही अनेक पुरूष दारूच्या आहारी जातात. सुरूवातीला आई-वडील, पत्नी-मुले त्याला समजावून सांगतात, पण तो कोणाचेच ऐकत नसेल तर दुसऱ्या कोणाला तरी त्याला समजावून सांगण्याची विनंती केली जाते. परिणामी परक्याचा पती-पत्नीच्या नात्यात शिरकाव होतो. तो परका माणूस कधी-कधी त्या संसारासाठी धोकादायक ठरतो. अकोला जिल्ह्यातही एक विवाहिता पतीच्या दारूच्या व्यसनाला पार वैतागून गेली होती, त्यामुळे पतीला समजावून सांगण्यासाठी ती चुलत दीराला बोलावू लागली. भावाला समजावता-समजावता त्याने वहिनीशी सूत जुळवले. दोघातील अनैतिक संबंध वाढत गेले. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला, पण यामध्ये तिचा पती अडथळा ठरत होता, तेंव्हा तिने चुलत दीराच्या मदतीने कारस्थान रचले आणि अत्यंत पध्दतशीरपणे पतीचा काटा काढला, पण पोलिसांनी अतिशय बारकाईने तपास करून संशयितांना २४ तासात अटक केली. अनैतिक संबंधातून झालेल्या खुनाचा हा सविस्तर वृत्तांत. अकोला जिल्ह्यातील बाळापुर तालुक्यात तुलंगा खुर्द नावाचे लहानसे गाव आहे. या गावापासून बीस किलोमीटर अंतरावर तामसी नावाचे दुसरे गाव आहे. तामसी येथे शालिग्राम मेसरे यांचा परिवार रहातो. शालिग्राम मेसरे यांना प्रमोद नावाचा एक मुलगा आहे. याचा विवाह मंगला हिच्यासोबत दहा वर्षाआधी पार पडला. प्रमोद आणि मंगला यांना तीन अपत्ये आहेत. यापैकी सर्वात लहान मुलगा हा अडीच वर्षाचा आहे. तामसी येथे राहून कुटुंब चालवणे शक्य नाही आणि मजुरीसुद्धा नाहीम्हणून प्रमोद आणि त्याची पत्नी मंगला दोन वर्षाआधी जवळच्या तुलंगा की दोघेही पती-पत्नी वीट भट्टीवर काम करू लागले. सोबत तीन लहान मुलेही होती. ...पान २ वर

## पत्नीला मारतच मामाचे डोके फिरले रागाच्या भरात भाच्याला ठार मारले

फोंडा (गोवा)/क्राईम रिपोर्टर

**माणूस किती जरी संयमी आला तरी त्याच्या संयमला मर्यादा असते. आणि जेंव्हा त्याच्या संयमाचा कडेलोट होतो तेंव्हा तो नातीगोती बघत नाही. गोव्यातील सांताक्रूझ फोंडा येथे अशाच एका घटनेत बहिणीच्या मृत्यूनंतर कृष्णा नाईक या इसमाने आपल्या भाच्याला मुलाप्रमाणे वाढवले, पण तो दारुडा निघाला आणि मामालाच शिवीगाळ करू लागला. एकदा तर त्याने मामीला बेदम मारले. त्यामुळे मामाचा संयम सुटला आणि मामाने झोपेत असलेल्या भाच्याची डोक्यात दगड घालून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मामाला अटक केली आहे.**

सांताक्रुझ फोंडा येथे कृष्णा सदाशिव नाईक हे आपल्या पत्नी मुलासह आपल्या वडिलार्जीत घरात राहयला आहेत. त्यांच्या मोठया बहिणीचे निधन गेल्या काही वर्षापूर्वी झाले. तिचा हिस्सा कृष्णा नाईक याच्या घरात असल्याने त्यांनी बहिणीचा मोठा मुलगा अविनाश याला आपल्या घरातील दुसरी एक खोली राहण्यास दिली. कृष्णा नाईक हे फोंडा येथील एका कारखान्यात काम करीत होते. त्यावरच त्याची रोजी रोजी चालत होती. घरची परिस्थीती ही बेताचीच असल्याने असेल त्याच्यात ते रोजी रोटी मानत होते. सुरूवातीच्या काही वर्षात त्याचा भाचा अविनाश हा काही ही कामधंदा करीत नव्हता. तरी ही त्याचा सांभाळ आपल्या मुला ...पान २ वर

## संशयखोर तरुणाच्या प्रेमात पडून फसली प्रेमवेडी पूनम नाहक जीव गमावून बसली

मुंबई/एस.कुमार

**प्रेमात पडलेला माणूस पूर्णपणे भावनेच्या आहारी गेलेला असतो. त्यामुळे आपण ज्याच्यावर प्रेम करतो तो माणूस किंवा ती तरुणी कशी आहे याची माहिती घेण्याची आवश्यकता वाटत नाही. कारण प्रेमात माणूस आंधळा झालेला असतो आणि त्याच हेच आंधळेपणा ताच्या जीवावर बेतू शकते. मुंबईच्या शिवाजी नगरमध्ये राहाणारी पूनम एका विवाहित माणसाच्या प्रेमात फसली, पण तो तिच्यावर संशय घेऊ लागला आणि याच संशयातून त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**





मानखुर्दच्या शिवाजीनगर परिसरातील साठेनगरमध्ये पूनम क्षीरसागर ही २७ वर्षीय अविवाहित तरुणी आई व विवाहित भावासोबत राहत होती. पूनम ही घरखर्चला मदत व्हावी म्हणून मुंबईत घरमाला जात होती. पूनम ही तरुणी १८ एप्रिल रोजी कामाला गेली. परंतु, ती घरी परतलीच नाही. तिच्या भावाने आणि नातेवाईकांनी पूनमचा सर्वत्र शोध घेऊनही तिचा काहीच ठिकाणा लागला नाही. त्यामुळे, १९ एप्रिल रोजी तिच्या आईने मानखुर्द पोलीस ठाण्यात मुलगी पूनम हरविल्याची तक्रार नोंदवली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मानखुर्द पोलिसांनी पूनमचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथके तयार केली. ही पथके बेपत्ता झालेल्या मुलीचा शोध घेत गोवंडी, मानखुर्द, शिवाजीनगर, साठेनगर परिसरात फिरून बेपत्ता तरुणीचा ठावठिकाणा शोधत होते .मात्र या परिसरात फिरत असताना, त्यांना गुप्त बातमी द्वारा मार्फत माहिती मिळली की, सदर तरूणीचे एका विवाहित मुस्लिम तरुणाशी प्रेम संबंध आहे. ...पान २ वर

## चुगलीखोरीचा संशय खूपच बळावत गेला अल्पवयीन मुलाने सुलेमानचा खून केला

हुपरी (कोल्हापूर)/क्राईम रिपोर्टर



मयत सुलेमान

**शिग्रकोपी माणूस कधी काय करील याचा नेम नाही. कारण अशा माणसाला पटकन राग येतो आणि त्यातून तो कोणत्याही थराला जातो. हुपरी जवळच्या पट्टणकोडोली येथे एका कोल्ड्रिंक एजन्सीमध्ये काम करणारा अल्पवयीन तरुण असाच शिग्रकोपी होता. त्यामुळे मालकाचा विश्वासू असलेल्या सुलेमान नावाच्या कर्मचाऱ्यावर तो सतत जळायचा. सुलेमान आपल्या विषयी मालकाचे कान भरतो असा त्याला संशय होता आणि याच संशयातून त्याने सुलेमानच्या डोक्यात रॉडचे घाव घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी पळून गेलेल्या त्या अल्पवयीन आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.**


रागाच्या भरात केलेले कोणतेही कृत्य हे खरे तर घातकच असते. राग आणि भीक माग अशीच नंतर वेळ येते पण हे हल्लीच्या तरूण मुलांना कोण समजावून सांगणार असा प्रश्न निर्माण होतो. कारण खटक्यावर बोट आणि जागेवर पलटी असेच ते वागत असल्याने एखाद्या गोष्टीचा क्षोकमोक्ष ते लावत असतात. त्यातून खरे तर त्याच्या हातून खूनाची घटना घडते. हातकणंगले तालुक्यातील हुपरी जवळील पट्टणकोडोली येथे कोल्ड्रिंकच्या गोडावूनमध्ये ...पान ६ वर

## संशयामुळे संसाराची शोकांतिका झाली पत्नीला ठार मारून पतीने आत्महत्या केली

नाशिक/क्राईम रिपोर्टर

**कधी कधी संशय माणसाला सुडाच्या दिशेने नेतो आणि एकदा का मनात सुडाची भावना निर्माण झाली की मग तो मागचा पुढचा विचार करीत नाही. नाशिक जिल्ह्याच्या कुकडणे गावात पतीचा पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. याच संशयातून त्याने तिला ठार मारून स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केली.**





सोमनाथ तुळशीराम कोदे रा. देशमुखनगर, पो.कुकडणे, ता.सुरगाणा याची बहीण वैशाली हिचे लग्न अर्जुन शामल पवार रा. बिशोनिया, ता. व्यारा, जि. वापी (गुजरात) याच्यासोबत सात वर्षापूर्वी झाले होते. वैशाली व अर्जुन हे होळी सणापासून भाऊ सोमनाथच्या घरी रहायला आले होते. सोमनाथ हा विभक्त रहात होता. थोड्याच अंतरावर सोमनाथचे वडील तुळशीराम लहाणू कोदे हे रहात होते. आपल्या भावाच्या घरी रहायला आल्यावर वैशाली आणि अर्जुन हे दोघेही मोलमजुरीसाठी जावू लागले. आपला भार भावावर पडू नये म्हणून दोघेही कामासाठी बाहेर पडत असत. अर्जुन हा नेहमी पत्नी वैशाली हिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिच्याशी भांडण करत असे. त्यावेळी भाऊ सोमनाथ आणि वडील तुळशीराम हे दोघे त्याला समजावून सांगत आणि त्यांच्यातील वाद मिटवत असत, पण एकदा डोक्यात शिरलेले संशयाचे भूत काही केल्या जात नाही. तसेच अर्जुनचे झाले होते. तो वैशालीवर संशय घेण्याचे काही सोडत नव्हता. त्यावरून सतत त्या दोघांमध्ये वाद होत असत. वेळोवेळी भाऊ आणि वडील हे वाद मिटवत ...पान ६ वर

## संशयावरून पतीची मती गुंग झाली साठीतल्या पतीने पत्नीची हत्या केली

नवी मुंबई/क्राईम रिपोर्टर

**काही पती पत्नी कामाधंद्याच्या निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी रहात असतात. पती चाकरमानी असेल तर तो मुंबईत राहतो तर पत्नी गावाकडे असते. पण त्यांच्यात एक विश्वासाचे नाते असते. पण काही लोक संशयी असतात. नेरुळमध्ये राहणाऱ्या लालबानू यांचे पती गावी रहायचे. पण ते मुंबईला जाऊन येऊन असायचे. त्यामुळेच त्यांचा पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता आणि याच संशयातून त्यांनी पत्नीची हत्या केली. मात्र पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

नवी मुंबई हत्येच्या घटनेने हादरलं आहे. ६० वर्षीय व्यक्तीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतला आणि क्षणार्धात होत्याच नव्हतं झालं. नवी मुंबई परिसरात घडलेल्या या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पत्नी नवी मुंबई शहरात वास्तव्यास होती, मात्र आरोपी हा गावी आणि मुंबई अशा दोन्ही ठिकाणी येऊन-जाऊन राहत होता. मात्र पत्नी कायमस्वरूपी नवी मुंबईमध्ये वास्तव्यास असल्याने पतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत, त्यातून दोघांची भांडण झाली आणि त्या रागात पतीने पत्नीला घरातच वार करून तिची हत्या केली. आयुष्यभरासाठी निवडलेला जोडीदार हाच वैरी बनला आणि मृत्यू काळ बनून आला. चारित्र्यावर संशय घेऊन पतीने पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना दारावे ...पान २ वर

## भीतीमुळे चोरी करणारा खूप अस्वस्थ झाला चोरी लपवण्यासाठी साक्षिदाराचा खून केला



भिवंडी/क्राईम रिपोर्टर

**भीती ही माणसाला सतत अस्वस्थ ठेवत असते. एखाद्या गोष्टीची त्याच्या मनात भीती निर्माण झाली की मग स्वतःला वाचवण्यासाठी तो काहीही करू शकतो. भिवंडीमध्ये अशाच एका घटनेत ड्राय फ्रूट चोरी करणाऱ्या आरोपीला चोरी करताना एकाने पाहिले होते. मात्र तो आपल्या चोरीबद्दल सगळ्यांना सांगेल या भीतीने त्या चोराने आपल्या साथीदारांच्या मदतीने चोरीचा साक्षीदार असलेल्या तरुणाची दगडाने ठेचून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**

आरोपीने ड्रायफूड दुकानात केलेल्या चोरी चा भांडाफोड करणार असल्याच्या रागातून दोघा जणांनी एका व्यक्तीची शहरातील टेमघर पाडा येथील निर्जनस्थळी दगडाने ठेचून हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे गुन्हा दाखल होताच अवघ्या सहा तासात दोघा आरोपींना ...पान २ वर

13 TO 19 MAY 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2024 8:43 PM Page 1



पान १ वरून...

## पालघरच्या तिरंगी लढतीत भूमिपुत्र...

पालघर कडे कधी सकारात्मक दृष्टीने पाहिलेच नाही किंवा दोन्ही सरकार मधील मंत्री संत्री कधी इकडे फिरकलेच नाही. मोदी आणि त्यांच्या पक्षातल्या भटा-बामणांनी पालघर जिल्हा फक्त महाराष्ट्राच्या नकाशावर पाहिला आहे. पण तिथे काय आहे, तिथला आदिवासी कसा जगतोय याच्याशी त्यांना घेणे-देणे नाही. त्यामुळे परप्रांतातील लोकांनी इथे येऊन आदिवासींच्या जमिनी बळकावल्या आणि त्यातून नालासोपारासारखी परप्रप्रांतियांची बेकायदा शहरे उभी राहिली. केंद्र व राज्य सरकारने भलेही पालघर जिल्ह्याकडे ढुंकूनही पाहिले नसले तरी इथल्या स्थानिक भूमीपुत्रांचा पक्ष म्हणून बहुजन विकास आघाडीने पालघर जिल्ह्याचा विकास स्वतःच्या ताकदीवर केला. त्यामुळेच या जिल्ह्यात वसईसारखी आंतरराष्ट्रीय कीर्तीची शहरे उभी राहिली. बहुजन विकास आघाडीमुळे या ठिकाणच्या आदिवासींच्या जमिनीला चांगले भाव आले. त्यांच्यामुळे शिक्षणाला चालना मिळाली. वसई, विरार, नालासोपारा, पालघर, बोईसर, वाडा, डहाणू या शहरांमध्ये उद्योग आले. इथल्या लोकांना चांगल्या नागरी सुविधा मिळाल्या. बविआचा याच कामामुळे वसई विरार महापालिका स्थापनेपासून त्यांच्या ताब्यात आहे. २००९मध्ये बविआचे बळीराम जाधव येथून खासदार झाले. एका प्रादेशिक पक्षाने या भागात जे केले ते राष्ट्रीय पक्षांना त्यांची सरकारे असताना करून दाखवता आले नाही म्हणूनच इथली जनता बविआच्या पाठीशी आहे. आजही त्यांचे ३ आमदार आहेत. त्यांची स्वतःची एक वेगळी ओळख आहे ताकत आहे. त्यामुळे मोदींनी इथे निवडणूक संपेपर्यंत जरी मुक्काम केला तरी भाजपचा उमेदवार येथून निवडून येऊ शकतं नाही. मागील निवडणुकीत येथून निवडून गेलेले राजेंद्र गावित यांचे या पक्षातून त्या पक्षात नाचकाम सुरू आहे आणि आता तर भाजपा बरोबरच शिंदे गटाचे लोकही त्यांच्यावर नाराज आहेत. शिंदे गटाचे प्रवक्ते काळे यांनी तर पत्रक काढून आपली गावितांवरील नाराजी जाहीरपणे व्यक्त केली. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा तर इथे नामो निशाणा नाही. राष्ट्रवादीचे आरटीआयच्या नावावर पोट भरणारे चींधीचोर कार्यकर्तेही कुठे गायब झालेत. त्यामुळे महायुतीची इथे वाईट अवस्था आहे. अशा स्थितीत मोदींच्या गॅरंटीवर डॉ. हेमंत सावरा यांचे डीपॉझिट वाचले तरी खूप झाले. महाविकास आघाडीच्या भारती कामडी यांचा सर्व भरोसा वाढवणं बंदराला विरोध करणाऱ्या लोकांच्या एकगठ्ठा मतदानावर आहे. कारण पक्ष म्हणून शिवसेनेची इथे फारशी ताकत नाही. पालघर जिल्ह्यात शिवसेनेची स्थिती आणि म्हणूनच जे इथले स्थानिक आहे ज्यांनी पालघर जिल्ह्यात काम केले आहे अशा बविआचा पाठीशी लोक उभे राहण्याची अधिक शक्यता आहे. म्हणून २०१४ किंवा २०१९ सारखे चित्र सध्यातरी दिसून येत नाही. त्यामुळे तूर्तास तरी पालघरच्या तिरंगी लढतीत बहुजन विकास आघाडीचे पारडे जड दिसतेय.

## पतीवरच्या रागामुळे माता वैरीणी...

पोलिसांनी त्या महिलेच्या पतीला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. नाशिकमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. तेथे एका ३० वर्षाच्या महिलेने तिच्या इमारतीच्या टेरेसवरून उडी मारून आयुष्य संपवलं. पण धक्कादायक गोष्ट म्हणजे आत्महत्या करणाऱ्या या महिलेची दोन मुलदेखील घरात मृतावस्थेत आढळली. या मृत महिलेने आयुष्य संपवण्यापूर्वी एका व्हिडिओद्वारे मेसेज शेअर केला होता, ज्यामध्ये तिने तिच्या पतीवर अनेक आरोप करत त्याला दोष दिला होता. आई आणि मुलांच्या या तिहेरी मृत्यूमुळे नाशिकमध्ये एकच खळबळ माजली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. बुधवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास पीडित महिलेने शहरातील कोणार्क नगर भागात असलेल्या हरिवंदन अपार्टमेंटच्या छतावरून उडी मारली. आत्महत्येपूर्वी या महिलेने तिच्या ८ वर्षाच्या मुलीला आणि २ वर्षाच्या मुलाला विष पाजले असावे, असा पोलिसांना संशय आहे. ती महिला खाली कोसळल्यानंतर तेथे राहणाऱ्या आजूबाजूच्या लोकांनी पोलिसांना माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी त्या मृत महिलेच्या घरी पोहोचून तपासणी केली असता घरात तिची दोन मुले मृतावस्थेत आढळून आली. तर मृत महिलेचा पती घराबाहेर होता. पोलिसांनी मृत महिलेने लिहिलेली एक चिठ्ठी जप्त केली आहे, ज्यामध्ये तिने तिच्या पतीवर छळ केल्याचा आरोप केला आहे. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्येपूर्वी या महिलेने एक व्हिडिओ मेसेजही रेकॉर्ड केला. पतीने आपल्याला हे जीवघेणे पाऊल उचलण्यास भाग पाडले, असा आरोप तिने या व्हिडीओमध्ये केला. महिलेने ही क्लिप तिच्या नातेवाईकांसोबत शेअर केली आहे. मृत महिलेचा पती हा कामानिमित्त पुण्यात होता, त्याला तपासात सहभागी होण्यासाठी बोलावण्यात आलं आहे, असं पोलिसांनी सांगितलं.

## अनैतिक संबंधात अडसर ठरला...

दिवसभर वीट भट्टीवर अवघड काम केल्यानंतर रात्रीचा थकवा जाणवू नये म्हणून बहुतांश मजूर सायंकाळी दारू पितात. प्रमोदलाही दारूचे व्यसन लागले. सुरूवातीला तो कमी प्रमाणात दारू प्यायचा, मात्र कालांतराने दारूचे प्रमाण वाढत गेले. आता प्रमोदला दररोज दारू प्यायची सवय लागली होती. दररोजच्या या प्रकारामुळे प्रमोद आणि मंगला त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद-विवाद सुरू झाले. दारूचे व्यसन वाढत गेले तसे घरातील भांडणही बाढत गेले. रागाच्या भरात आता तो पत्नीला मारहाणही करायचा. दिवसेंदिवस हा प्रकार वाढतच चालला होता. अखेर आपल्या पतीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून तिने पत्तीचा चुलत भाऊ गोटू मेसरे याला फोन करून आपल्या पतीला समजावून सांगण्याची विनंती केली. गोटू हा तामशी गावात रहातो. चुलत वहिनीचा फोन आल्यामुळे तो तुलंगा खुर्द येथे पोहोचला आणि त्याने आपल्या भावाला म्हणजे प्रमोदला दारू पिऊ नको म्हणून समजावून सांगितले.मात्र गोटूच्या समजावण्याने काही फरक पडला नाही. प्रमोदचे ये रे माझ्या मागल्या असे सुरूच होते, त्यामुळे पती प्रमोदने घरात गोंधळ घातला की त्याची पत्नी मंगला ही गोटूला फोन करायची. तिचा फोन आला की गोटू लगेच यायचा. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू आहे. सतत जाणे-येणे वाढल्यामुळे गोटू आणि मंगला यांच्यातील जवळीक वाढत गेली. तो आपल्या हाकेला धावून येतो हे पाहून तिला त्याचा आधार वाटू लागला, त्यामुळे ती मनातील सगळे त्याला सांगू लागली, ती सगळे काही हक्काने आपल्याला सांगते हे पाहून गोटूच्या मनातही तिच्याबद्दल हळूवार भावना तयार झाली. दोघे एकमेकाकडे आकर्षित झाले होते. एकमेकाशी बोलले नाही, एकमेकाला भेटले नाहीत तर त्यांना करमत नव्हते. हळूहळू त्यांच्यातील जवळीक इतकी वाढली की त्यांच्यात प्रेमसंबंध कधी निर्माण झाले हे त्यांनाही कळले नाही. प्रमोद दारूच्या नशेत असल्याने त्या दोघांना एकांत मिळत होता. याचा फायदा घेत त्यांनी एकमेकाशी संबंध ठेवणे सुरू केले. आता दोघात संबंध निर्माण झाल्यामुळे तिला पतीची गरज नकोशी झाली. तसाही पती प्रमोद हा दारू पिल्यानंतर झोपी जायचा आणि गोटू हा मंगलासोबत गप्पा-गोष्टी करायचा. तिला समाधान द्यायचा. यातून प्रकरण इतके वाढले की मंगला आणि गोटू पती-पत्नीसारखे राहू लागले. गोटू हा अविवाहित आहे, मात्र त्याने तिला लग्नाचे आश्वासन दिले आणि मुलेही सांभाळण्याची तयारी दाखवली. यामुळे मंगलाला आता पतीऐवजी तिचा चुलत दीर गोटू हा जास्त जवळचा वाटू लागला. तिला त्याच्याशी लग्न करायचे होते. पती प्रमोद हा दारू पित असला तरी त्याला व्यवहारिकज्ञान चांगले होते. कुटुंबावर तो बारकाईने लक्ष ठेवायचा, त्यामुळे आपले अनैतिक संबंध चुलत दीरासोबत आहेत हे पतीला कळले तर तो एखाद्या दिवशी जीव घेऊन टाकेल अशी भीती मंगलाला होती. तिने ही भीती गोटूजवळ बोलून दाखवली. मंगलाने सांगितलेल्या या गोष्टीमुळे गोटू अलर्ट झाला आणि आपल्या प्रेमप्रकरणाची भनक प्रमोदला लागली तर ते आपल्यासाठीहीं' घातक आहे हे गोटूला समजले. यावरून मंगला आणि गोटू यांच्या गुप्त चर्चा सुरू झाली. आपल्या जीवनातून प्रमोदला कसे संपवायचे? यावर त्यांनी विचारविनिमय सुरू केला. प्रमोदची अडचण दूर करायची असेल तर त्याचा नियोजनबद्धरित्या खून करावा लागेल. प्रमोद आपल्या जीवनातून गेल्यास आपल्याला कोणती अडचण येणार नाही यावर दोघांचे एकमत झाले. प्रमोदला मारायचे कसे? आणि हे प्रकरण रफादफा कसे करायचे? यावर दोघांनी वारंवार चर्चा केली. मंगला आणि गोटू यांनी संगनमत करून एक कारस्थान रचले. दि. १९ मार्च रोजी प्रमोदचा कार्यक्रम करण्याचे त्या दोघांनी ठरवले. त्या रात्री प्रमोद नेहमीप्रमाणे दारू पिऊन आला. त्याने पत्नीसोबत वाद केला. यानंतर तो झोपी गेला. आधीपासूनच तयारीत असलेल्या मंगलाने गोटूला फोन करून तुलंगा येथील वीटभट्टीवर बोलावून घेतले. रात्री अंधाराचा फायदा घेऊन तो एकटाच मंगलाच्या घरी पोहोचला. मुलंही झोपली होती. मंगला आणि गोटू एकत्र आल्यानंतर निपचित पडलेला प्रमोद त्यांना दिसला. यावेळी गोटूने दोरीचा आधार घेत प्रमोदचा झोपेत गळा घोटला तर मंगलाने हात-पाय दाबून ठेवले.पाच मिनिटात प्रमोद मरण पावला. आधीच शरीराने अर्ध मेला असलेल्या प्रमोदला प्रतिकार करण्याची संधीही मिळाली नाही. सेकंदात त्याचे प्राणपाखरू उडाले. काम फत्ते झाल्यानंतर गोटू हा मोटरसायकलने मध्यरात्री तामसीगावाकडे रवाना झाला. तो त्याच्या घरी जाऊन झोपला. इकडे प्रमोदची पत्नी मंगला हिने पहाटे पहाटे नाटक करून, माझे पती उठत नाही म्हणून आरडाओरड सुरू केला, रडायला सुरूवात केली. तिने विटभट्टी मालकाला फोन करून बोलावून घेतले. माझी पती बोलत नाहीत, त्यांना काय झाले बघा असे म्हणून ती गयावया करू लागली. वीटभट्टी मालकाने प्रमोदला तातडीने जिल्हा रूग्णालयात भरती केले, मात्र डॉक्टरांनी त्याला सुरू मृत घोषित केले. दवाखान्यात मृत्यू झाल्यामुळे प्रमोदचे शवविच्छेदन करण्यासाठी त्याचा मृतदेह शवागारात ठेवण्यात आला. पोलिसांनी पंचनामा केला. डॉक्टरांनी शवविच्छेदन केल्यानंतर अँडव्हान्स रिपोर्ट पोलिसांना सादर केला. या अहवालामध्ये प्रमोदचा मृत्यू हा हार्ट अटॅकने झाला नसून त्याचा गळा आवळून श्वास घोटल्याने झाला असा अभिप्राय प्राप्त झाला. बाळापूर पोलिसांनी या रिपोर्टच्या आधारे अज्ञात आरोपीविरूद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. बाळापुर पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक १८६/२०२४ कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर ठाणेदार अनिल जुमडे न यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु झाला. प्रशिक्षणार्थी आय. अधिकारी गोकुल राज जी बाळापूरचे उपविभागीय अधिकारी आहेत. त्यांनीही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता योग्य पद्धतीने तपास करण्याच्या सूचना दिल्या. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक अनिल जुमडे यांनी ए.पी.आय. कांबळे यांच्याकडे दिला. पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी मृतकाची पत्नी मंगलाची विचारपूस केली. पोलिसांची दिशाभूल करण्याचा तिने पूर्ण प्रयत्न केला, मात्र पोलिसांच्या प्रश्नांच्या सरबतीमुळे तिचे नाटक जास्त वेळ चालू शकले नाही आणि तिने आपल्या गुन्ह्याची कबुली देऊन टाकली. चुलत दीर गोटू मेसरे रा. तामशी तालुका बाळापूर जिल्हा अकोला यांच्या मदतीने पतीचा गळा आवळून खून केला अशी माहिती पोलीस तपासात निष्पन्न झाल्यामुळे पोलिसांनी मंगला व तिचा प्रियकर गोटू याला ताब्यात घेतले. प्रमोद दारू पित असल्यामुळे मी त्याला समजावण्यासाठी वारंवार घरी यायचो, त्याची दारू सुटली नाही. परंतु त्याच्या पत्नीसोबत माझे सूत जुळले. आमच्यात शारीरिक संबंधसुद्धा झाले. आम्ही आता एकमेकाशिवाय राहू शकत नव्हतो आणि प्रमोद हा आमच्यासाठी मोठा अडथळा ठरत होता, म्हणून आम्ही संगनमत करून प्रमोदचा झोपेत खून केला अशी माहिती संशयित आरोपीकडून वदवून घेण्यात पोलिसांना यश आले. दारूच्या आहारी गेल्यामुळे पत्नी वाईट मार्गाला लागली आणि दुसऱ्यासोबत अनैतिक संबंध झाले. घटनेला पती प्रमोद कारणीभूत असल्याचे दिसत आहे. दारू पितांना लोकांनी भान ठेवायला पाहिजे, आपल्या कुटुंबाचा विचार करायला पाहिजे. नाही तर कुटुंबाची कशी राख रांगोळी होते या घटनेवरून दिसून येते. या प्रकरणाचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल जुमडे, ए.पी.आय. कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल अक्षय देशमुख करत आहेत. मंगलाने स्वतःच्या सुखासाठी तीन लहान मुलांना अनाथ केले. दुसऱ्याच्या प्रेमात पडल्यानंतर पतीचा खून करण्याची तिची आयडिया तिच्या अंगलट आली. कमी शिक्षित असलेले लोक असे निर्णय घेतात आणि कोणती तरी चूक त्यांना कारागृहात पोहोचवते. हाच प्रकार मंगला व गोटू मेसरे या प्रियकरांमध्ये घडला. दोघेही कारागृहात जाऊन बसले आणि तीन लहान मुले वनवन भटकत आहेत. या घटनेत प्रमोदचा जीव गेला तर त्याची पत्नी कारागृहात गेली ही घटना हृदयाचा थरकाप उडवणारी असली तरी त्या लहान मुलांच्या भवितव्याचे काय? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. अशा घटनांना आळा बसावा यासाठी समाज जागृती झाली पाहिजे जेणेकरून अनाथ मुलांवर अशी वेळ येणार नाही अशी प्रतिक्रिया जनमानसात उमटत आहे. या प्रकरणात पोलिसांनी सतर्कता दाखवली नसती तर कदाचित मुख्य आरोपी समोर आले नसते बाळापूर पोलिसांच्या समय सूचकतेमुळे हा गुन्हा उघडकीस आला.

## पत्नीला मारतच मामाचे डोके...

प्रमाणेच करीत होते.कृष्णा यांचे आता वय होत आल्याने त्याच्या हातून जेम तेमच काम होत होते. अलिकडच्या काळात अविनाश याच्याबरोबर त्याचे फारसे काही पटत नव्हते. रोज कोणत्या ना कोणत्या कारणातून अविनाश हा मामा कृष्णा याच्याबरोबर भांडण काढत होता. तसेच मामीला ही तो नको नको ते बोलत होता. अविनाश हा रोज दारू पिऊन येऊन मामा मामीला शिव्या घालत त्याच्याशी वाद घालत होता. त्यामुळे मामा कृष्णा हे त्याच्यावर वैतागून होते. कशाला याला आपल्या घरात ठेवून घेतले असे त्याच्या मनाला वाटत होते. अविनाश हा गोव्यात राहत असल्याने त्याला मौज मस्ती करण्याचा नाद लागला होता. वयाची ४०शी ओलांडली तरी त्याचे लग्न ही कुठे जमत नव्हते. त्यामुळे त्याला ही कशातच रस वाटत नव्हता. अलिकडेच तो डिलीव्हरी बॉयचे काम करू लागल्याने कामावरून येताना तो दारू पिऊन येत होता. आता तर मनात आले तरच तो काम करीत होता. आपल्या खर्चापुरेतच तो काम करीत असल्याने सगळे पैसे तो दारूच्या व्यसनात उडवित होता. तसा तो कामचुकार असल्याने त्याला एक काम जरी सांगितले तर तो ते काम मन लावून करीत नव्हता. कृष्णा नाईक यांचे घर तसे साधेच पण कौलारू होते. घरावर पत्रे होते. गेल्या दोन महिन्यापूर्वी गोव्यात वादळी पावासाने धुमाळून घातला होता. त्या वादळी पावसात त्याच्या घराचे जुने पत्रे उडून गेले होते. काही मोजकेच पत्रे राहिले असल्याने कसे बसे दिवस ढकलत जगत होते. नविन पत्रे आणून घालण्याची त्याची परिस्थीती नव्हती. सध्या पावसाळा तोंडावर आल्याने घरावर पत्रे आणून घालणे गरजेचे होते. पावसाळ्यात घराचे नुकसान आणखीन जास्त होईल याची भिती त्यांना होती. पण याचे सोयरसुतक अविनाश याला नव्हते. मामा कृष्णा यांनी त्याला गेल्या दोन महिन्यापूर्वीच घरावर पत्रे आणून घाल अशी सुचना केली होती. परंतु त्यांच्या सुचनेकडे अविनाश याने सोईस्करपणे दुर्लक्ष केले होते. रोज रात्री घराकडे येताना दारू पिऊन येणे आणि मामा मामीच्या नावाने दंगा करणे एवढाच त्याचा उद्योग होता. त्यातच अविनाश राहत असलेल्या खोलीवरचे पत्रे उडून गेल्याने पत्रे घालण्याची जबाबदारी ही त्याची आहे असे ते त्याला सांगत होते. त्याने जर वेळेत पत्रे घातले नाही तर पावसाचे पाणी त्याच्या खोली बरोबरच कृष्णा राहत असलेल्या खोलीत ही येणार होते. म्हणून ते त्याला लवकरात लवकर पत्रे घालून घे असे म्हणत होते. पण प्रत्येक वेळेला माझ्याकडे तो पैसे नाहीत हेच कारण मामा कृष्णा यांना सांगत होता. त्याला दारू प्यायला आणि बाहेरून पार्सल आणून जेवण करायला त्याच्याकडे पैसे आहेत पण घरावर पत्रे घालायला पैसे नाहीत हे कसे शक्य आहे असे कृष्णा यांच्या मनात येत होते. मागे एकदा अविनाश हा फुल्ल दारू पिऊन आल्यावर कृष्णा यांनी त्याला तुला दारू प्यायला पैसे आहेत आणि घरावर पत्रे घालायला पैसे नाहीत काय? असे विचारत त्याला तु माझे घर सोडून आता बाहेर निघून जा. माझ्या बहिणीचा हिस्सा हा बहिण हयात असेपर्यत होता. बहिण गेल्यानंतर तुला तिचा हिस्सा देवू शकत नाही.त्यामुळे तु तुझी सोय आता दुसरीकडे कर असे त्यांनी त्याला सांगितले. मामा आपल्याला घरातून बाहेर काढायलाच उठला आहे. हे त्याच्या लक्षात आल्यावर तो मामा मामीबरोबर जास्तच वाद घालू लागला. माझ्या आईचे घर आहे मी राहणारच असे तो त्यांना सांगत होता. त्यातच त्याच्या त्रासाने त्याची मामी वैतागलेली असल्याने ती नवरा कृष्णा यांना काही ही करून त्याला घराबाहेर काढा असा तगादा लावीत होती. सोमवार दि.२९ एप्रिल रोजी अविनाश हा नेहमीप्रमाणेच घराकडे येताना दारू पिऊन हालत डुलत आला. तो नशेत आल्याचे बघून मामा कृष्णा हे त्याच्यावर ओरडले. तुला दारू प्यायला पैसे आहेत आणि पत्रे आणायला पैसे नाहीत असे म्हणत ते त्याच्याशी वाद घालत होते. त्यातच त्याची बायको ही भाचा अविनाश याला नको नको ते बोलत होती. अगोदरच दारूच्या नशेत असलेल्या अविनाश याला मामा मामीचा राग आला होता. नेहमीप्रमाणे त्यांना उद्दट भाषेत बोलत तो त्याच्या अंगावर गेला. त्याने रागाच्या भरात मामा मामीला जबर मारहाण केली. जवल पास तास भर त्याचा दंगा चालू होता. त्याच्या शेजाऱ्यांनी ही त्याचे हे नेहमीचे आहे म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष केले.भाच्याने आपल्याला व आपल्या बायकोला मारहाण केल्याचा राग कृष्णा याच्या मनात होता. त्यांना रात्रभर झोप लागली नाही. मध्यरात्री पहाटे दोनच्या सुमारास ते झोपेतून उठले. भाचा अविनाश हा त्याच्या खोलीत हा गाढ दारूच्या नशेत झोपला आहे हे त्यांनी बघितले. त्यांनी गुपचुप जावून बाहेरून एक मोठा दगड आणला आणि त्यांनी तो दगड झोपलेल्या अविनाश याच्या डोक्यात आणि छातीत दोन वेळा घातला. त्यासरशी अविनाश याच्या डोक्याला गंभीर जखम होऊन त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाला. त्याला त्यांनी ओरडण्याची ही संधी दिली नाही. त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे बघून त्यांनी कोणाला काही कळणार नाही अशा पध्दतीने आपल्या खोलीत जावून झोपले. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून त्यांनी अविनाश याचा कुणी तरी खून केला आहे म्हणून शेजाऱ्यांना ओरडून सांगितले. घटनास्थळी बघ्यांनी आणि शेजाऱ्यांनी गर्दी केली. कुणी तरी या घटनेची माहिती फोंडा पोलीसांना दिल्यावर तातडीने पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी रक्ताने माखलेला दगड पडला असल्याचे तसेच मयत अविनाश याच्या डोक्यावर आणि छातीवर मारहाण झाल्याच्या खुणा ही दिसत होत्या. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी फोंडा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलिसांनी या घटनेची माहिती मयत अविनाश याचे मामा कृष्णा नाईक याचेकडून घेतली असता त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती जाणवत होती. तसेच पोलीसांनी शेजाऱ्याकडे या घटनेची चौकशी केली असता घटनेच्या आदल्या रात्री मयत अविनाश याचे त्याचे मामा मामी बरोबर भांडण झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. एवढया माहितीवरून पोलीसांनी कृष्णा नाईक आणि त्याच्या पत्नीला ताब्यात घेऊन वेगवेगळे करून चौकशी केली असता मामा कृष्णा यांनीच अविनाश नाईक याच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केल्याचे कबुल केले. या घटनेची फिर्याद मयत अविनाश याच्या नातेवाईकांनी दिल्यावर त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मयत अविनाश धनंजय नाईक (वय ४२) याच्या खून प्रकरणी मामा कृष्णा सदाशिव नाईक (वय ६७) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्यांना म्हापसा येथील कोर्टात उभे केले. मा.कोर्टाने कृष्णा नाईक यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेला दगड जप्त केला. या घटनेचा तपास फोंडा पोलीस करीत आहेत.चल आणि स्थिर मालमत्तेच्या वादात रक्ताची नाती ही एकमेकांना ओळखत नाहीत त्यातूनच अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## संशयखोर तरुणाच्या प्रेमात ...

त्या माहितीच्या आधारे २४ एप्रिल रोजी मानखुर्द पोलिसांनी निझामुद्दीन शेख याला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावले. त्याला पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी केली असता तो पोपट सारखा बोलू लागला. निजामुद्दीन अली शेख हा मूळचा उत्तर प्रदेशातील लखनौ येथील रहिवाशी असून तो विवाहित आहे, तसेच त्याला दोन वर्षाचा मुलगा देखील आहे. त्याची बायको गावी राहते. निजामुद्दीन हा एकटाच मुंबईत पोट भरण्यासाठी आला होता. त्यामुळे निजामुद्दीन याचा मुंबईत राहण्याचा ठिकाणा नव्हता. तो मिळेल त्याची टॅक्सी चालवायचा आणि कुठेही राहायचा. तो शिवाजीनगर ते नागपाडा असा टॅक्सी चालवायचा. तर मृत तरुणीही नागपाडा येथे घरकामासाठी जायची. चार वर्षापूर्वी पूनम व निजामुद्दीन या दोघांची ओळख झाली आणि ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. दोघेही एकमेकांवर प्रेम करू लागले. पूनम ही अविवाहित होती. तर निजामुद्दीन हा विवाहित होता. ही गोष्ट त्याने पूनम पासून लपवून ठेवली होती. प्रेम आंधळं असते.ते जात पात, धर्म बघत नाही. एखादा की माणूस प्रेमात पडला की तो वेडा होतो, त्याला आपले स्वकीय दिसत नाहीत. पूनम ही त्याच्या भूलथापांना बळी पडून निजामुद्दीन च्या प्रेमात पडली.ती त्याच्यावर जीवापाड प्रेम करत होती. तो मात्र पूनम हिच्यावर संशय घेत होता.तिचे इतर व्यक्ती सोबत देखील संबंध असल्याचा निजामुद्दीन याला संशय होता. त्यामुळे त्याच्या मनात ती गोष्ट खटकु लागली. अखेर तिचा घात करण्याचा त्याने कट रचला. १८ एप्रिल रोजी पूनम कामाला गेली. ती घरी निघाली असता, निजामुद्दीन याने पूनमला फिरायला जाण्याचा बहाण्याने टॅक्सीमध्ये सोबत घेतले. तसेच तिला लग्नाचे आमिष दाखवून त्याच दिवशी तो तिला कल्याण येथील खडवली परिसरात घेऊन गेला. या ठिकाणी रात्रभर मुककमी राहिल्यानंतर निजामुद्दीन याने पुनमची गळा आवळून हत्या केली. त्यानंतर, तिचा मृतदेह गोणीत भरून टॅक्सीतून मध्यरात्री चिरनेर येथे आणला. त्यानंतर त्याने मृतदेह टाकण्यासाठी त्याच्या परिचयातील सोहेल खान याला फोन केला. सोहेल खान हा चिरनेर येथील एका चायनीज स्टॉलवर काम करून त्याच ठिकाणी राहत होता. त्यामुळे त्याला या परिसरातील बऱ्यापैकी माहिती होती. निजामुद्दीन ने त्याला थोडक्यात घटनाक्रम सांगून राजी केले.सोहेलने त्याला सुरक्षित जागा शोधून देत पूनमच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात मदत केली. सोहेलच्या मदतीने निजामुद्दीन याने उरणमधील चिरनेर-तिघाटी रस्त्यावर पूनम हिचा फेकून दिला,आणि टॅक्सी घेऊन पळून गेला.दरम्यान निजामुद्दीन अली शेख याचे पूनम सोबत प्रेमसंबंध होते. मात्र पूनम हिचे इतर व्यक्ती सोबत देखील संबंध असल्याचा निजामुद्दीन अली याला संशय होता.या संशयातून त्याने ही हत्या केल्याची कबुली दिली आहे.या घटनेनंतर मानखुर्दमध्ये संतापाची भावना असून आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे.या हत्ये प्रकरणी पोलिसांनी निजामुद्दीन शेख (२७) याला अटक केली असून त्याला मदत करणारा आरोपी सोहेल खान याला देखील उरण पोलिसांनी अटक केली आहे. मातंग समाजाने देखील या प्रकरणी आंदोलन करून पूनम हिला न्याय मिळवून उग्र आंदोलन सुरू केले. दरम्यान उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मृत तरुणीच्या कुटुंबीयांची सोमवारी सकाळी भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. सरकार आरोपींवर कठोर कारवाई करेल, असे लोढा यांनी सांगितले. कुटुंबीयांनाही संरक्षण देण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. बांगलादेशी नागरिकांची विशेष शोधमोहीम राबविण्याचे आदेश लोढा यांनी या वेळी महापालिकेस दिले आहेत. मालवणी, चेंबूर, अंधेरीनंतर आता ही मुंबईतील चौथी घटना आहे. याकडे पोलिसांना दुर्लक्ष करून चालणार नाही, असेही लोढा यांनी यावेळी म्हटले.

## संशयावरून पतीची मती गुंग झाली...

गावात घडली आहे. पत्नीच्या हत्येनंतर मारेकरी पती पश्चिम बंगालला पळून जाण्याचा बेत आखत होता. मात्र पोलिसांनी त्याला अटक केली आहे. त्याच्याविरुद्ध नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दारावे गावात शनिवारी रात्री महिलेचा खून झाल्याची घटना घडली. दारावे गावातील लालबानू सरदार (वय ४५) यांचा मृतदेह घरात आढळून आला. मुलगा घराबाहेर गेला होता. त्यावेळी लालबानू सरदार या घरात एकट्याच होत्या. त्यावेळी पती-पत्नीमध्ये वाद झाले. पतीने चारित्र्यावर पत्नीवर संशय घेतल्याने दोघांमध्ये भाडण झालं. रागाच्या भरात पतीने पत्नीची हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच नेरुळ पोलिसांनी घटनास्थळ गाठून पाहणी केली. तपासात लालबानू यांची डोक्यात जड वस्तूने प्रहार करुन हत्या करण्यात आल्याचं स्पष्ट झालं. याशिवाय घटनास्थळी पोलिसांना रक्ताने माखलेले फरशीचे तुकडे आणि चाकूही सापडले आहेत. यानंतर पोलीस पथकाने तातडीने तपास सुरू केला आणि आरोपी उस्मानला अटक केली. चौकशीत त्याने आपला गुन्हा कबूल केला आहे. पत्नीसोबत झालेल्या भांडणात त्याने पत्नीच्या डोक्यात लादीने वार करून तिचा खून केल्याची कबुली दिली आहे. पतीनेचे पत्नीची हत्या केल्याच्या घटनेने संपूर्ण नवी मुंबई शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## भीतीमुळे चोरी करणारा खूप अस्वस्थ...

अटक करण्यात शांतीनगर पोलिसांनी यश मिळवले आहे. आकलेश जयसिंग, जयसिंग चौहान, वय ३६ वर्षे रा.प्रेमनगर गोरेगाव मुंबई असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी सकाळी दहा ते साडे सह वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने आकलेश जयसिंग चौहान यास कल्याण भिवंडी रस्त्यावरील साईबाबा मंदिराचे पाठीमागील जंगलात त्यांचे चेहऱ्यावर तोंडावर मोठा दगड मारून हत्या केल्याचे उघडकीस आले. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेऊन मयताची ओळख पटवली .व त्यानंतर साईबाबा मंदिर व परिसरातील सीसीटिव्ही फुटेजच्या आधारे पद्मानगर परिसरातून इकलाख अहमद अली अन्सारी व रामनारायण सितोसी चव्हाण या दोघा संशयितांना अवघ्या सहा तासात ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता आरोपी इकलाख अन्सारी याने ड्रायफूड दुकानात केलेल्या चोरीचा प्रकार हत्या झालेल्या इसमास माहित होतं तो लवकरच तो उघड करणार होता या रागातून त्यांनी हत्या केल्याची कबुली दिली. मयत व्यक्तीचा भाऊ निलेश जयसिंग चौहान यांनी दिलेल्या तक्रारी वरून शांतीनगर पोलिस ठाण्यात दोघां विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

## लष्कराच्या वाहनाच्या धडकेमुळे सुरक्षा रक्षकाचा मृत्यू

ठाणे/प्रतिनिधी

कोलशेत येथील वायु दलाच्या प्रवेशद्वारावर लष्कर अभियंता सेवेच्या (मिलिट्री इंजिनीअर सर्व्हिस) वाहन प्रवेशद्वाराला धडकून त्या प्रवेशद्वाराचा धक्का लागल्याने सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला आहे. रोशन झा (२४) असे मृत सुरक्षा रक्षकाचे नाव आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोलशेत येथे वायु दलाचे तळ आहे. कोलशेत वरचा गाव भागात राहणारा रोशन झा मागील वर्षभरापासून वायुदलाच्या प्रवेशद्वारावर खासगी सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होता. बुधवारी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास रोशन झा हे प्रवेशद्वारावर कार्यरत असताना लष्कर अभियंता सेवेचे वाहन त्याठिकाणी आले. त्यावेळी वाहनाची येथील प्रवेशद्वाराला जोरदार धडक बसली. त्यामुळे प्रवेशद्वाराचा रोशन यांच्या डोक्याला धक्का लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चालत्या-फिरत्या डेंटल व फिजिओथेरपी मोबाईल व्हॅनचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी**

शहरी व ग्रामीण भागातील नागरीकांना आपल्या दारात दंत रोगावर व फिजिओथेरपी उपचार घेता यावेत यासाठी दोन चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. अत्याधुनिक व सुसज्ज अशा चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन क्लिनिक व्दारे लातूर शहरासह ग्रामीण भागातील नागरीकांना दंत रोग व फिजिओथेरपी उपचार हे या घरपोच दिले जातील, असा विश्र्वास एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केला. माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय आणि एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या चालत्या-फिरत्या मोबाईल व्हॅन क्लिनिकचे अनावरण डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. कराड बोलत होते. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मुख शल्य तज्ञ डॉ. अमोल डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या अनेक वर्षापासून एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागात शिबिराच्या माध्यमातून दंत आरोग्य व फिजिओथेरपी उपचार सेवा देवून हजारो रुग्णांना व्याधीमुक्त करण्यात आले आहे. या सेवेची व्याप्ती वाढवून रुग्णांना आपल्या गावात, घरासमोर जाऊन दंत व फिजिओथेरपी उपचार हे अत्याधुनिक स्वरुपात देण्याचा मानस होता, असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, याचाच एक भाग म्हणून हे दोन मोबाईल व्हॅन क्लिनिक नागरीकांच्या सेवेत दाखल होत आहेत. अत्याधुनिक सोयींनीयुक्त असलेल्या डेंटल मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील सामान्य रुग्णांवर, बेडेड (चालता-फिरता न येणाऱ्या) रुग्णांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करुन दंत रोगाचे योग्य निदान आणि प्रथमोपचार केले जातील. दात काढणे, दातांची स्वच्छता करण्याचे उपचारही केले जातील. तसेच विविध शाळांमध्ये दंत आरोग्य शिबिरे घेवून शालेय मुलांची दंत तपासणी करुन उपचार करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर फिजिओथेरपी मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून तज्ञ डॉक्टरांकडून फिजिओथेरपी उपचार सेवा दिली जाणार आहे. मान, पाठ, कंबर, गुडघे दुखी, सांधेदुखी, अर्धांगवायू व हृदयविकाराचे रुग्ण, ज्येष्ठ नागरीक आणि सिरेबल पाल्सी आजाराचे बाल रुग्ण, क्रीडा दुखापतींचे रुग्ण, बेडेड रुग्णांना अत्याधुनिक उपकरणांद्वारे फिजिओथेरपी उपचार केले जाणार आहेत. लातूर जिल्ह्यासह परिसरातील जिल्ह्यातील गरजु रूग्णांपर्यंत दंत आरोग्य आणि फिजिओथेरपी उपचार सेवा पोहचविण्याचा प्रयत्न या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून करणार असल्याचे डॉ. हनुमंत कराड यांनी सांगीतले. यावेळी डेंटल व्हॅनचे पूजन उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांनी केले तर फिजिओथेरपी व्हॅनचे पूजन प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल ज्ञानोबा केंद्रे यांनी करुन शेवटी आभार मानले. या कार्यक्रमासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील डॉक्टर, कर्मचारी उपस्थित होते.

# डोंबिवली येथे रस्त्यावर चक्कर येऊन पडलेल्या बेशुध्द महिलेचे दागिने लुटले!

**डोंबिवली/प्रतिनिधी**

डोंबिवली पूर्वेतील रेल्वे स्थानका जवळील नेहरू रस्त्यावरील छत्रपती शिवाजी उद्यानात बुधवारी रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान एक महिला चक्कर होऊन रस्त्यावर पडली. बेशुध्दावस्थेत गेल्याने या महिलेला मदत करतो दाखवून एका भामट्याने या महिलेच्या हातामधील एक लाख ८० हजार रूपये किमतीच्या सोन्याच्या बांगड्या चोरून नेल्या. रामनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणाची तक्रार करण्यात आली आहे. धरा प्रतीक सावला (२८) असे महिलेचे नाव आहे. त्या वल्लभभाई पटेल रस्ता सारस्वत कॉलनी भागात राहतात. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार धरा प्रतीक सावला या बुधवारी रात्री आठ वाजणेच्या दरम्यान डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी उद्यानात फिरण्यासाठी आल्या होत्या. अलीकडे उकाड्याचे दिवस आहेत. दिवसभर घामाच्या धारांनी अस्वस्थ नागरिक संध्याकाळच्या वेळेत शहरातील उद्याने, बगिचांमध्ये फिरण्यासाठी येतात. त्याप्रमाणे तक्रारदार धरा सावला या छत्रपती उद्यानात बुधवारी फिरण्यासाठी आल्या होत्या. उद्यानात फिरत असताना अचानक त्यांना चक्कर आली. त्या उद्यानातील मोकळ्या जागेत पडल्या.




त्या बेशुध्दावस्थेत गेल्या. या कालावधीत धरा यांना मदत करण्याच्या बहाण्याने एका भुरट्याने त्यांच्या हातामधील सोन्याच्या एक लाख ८८० हजार रूपये किमतीच्या सोन्याच्या बांगड्या चोरून पलायन केले. इतर नागरिकांनी धरा सावला यांना पाणी देऊन शुध्दीवर आणले. त्यांना प्रथमोपचारासाठी साहाय्य केले. शुध्दीवर आल्यानंतर धरा सावला यांना आपल्या हातात सोन्याच्या बांगड्या नसल्याचे दिसले. त्यांनी उद्यानात शोध घेतला, पण त्यांना बांगड्या आढळून आल्या नाहीत. भुरट्या चोरानेच त्या चोरून नेल्या असाव्यात, असा संशय व्यक्त करून धरा यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. साहाय्यक पोलीस निरीक्षक पी. के. नरळे तपास करत आहेत.

## परदेशात नोकरीच्या आमिषाने दिडशे तरुणांची फसवणूक

# नवघर पोलिसांकडून टोळीतील तिघांना अटक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

शेकडो तरुणांना परदेशात नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीतील ३ आरोपींना नवघर पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून ६ लाख रुपयांचा मुद्देमाल तसेच १४९ पारपत्र जप्त करण्यात आले आहेत. भाईंदर पूर्व येथील ईगल प्लेसमेंट सर्व्हिसेस कार्यालयाकडून ऑनलाईन तरुणांना परदेशात नोकरी देण्याचे प्रलोभन दाखविण्यात आले होते. यात प्रत्येकाकडून कंपनीने काम करण्यासाठी ७० हजार रुपये घेतले होते. या सर्वांना विमानाची तिकिटे व व्हीजाही देण्यात आले होते. मात्र त्यांचे पासपोर्ट घेऊन कंपनी मालक फरार झाले. याबाबत काही तरुणांनी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दखल केल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले. दिडशेहून अधिक तरुणांची फसवणूक झाल्याचे तपासात समोर आले. नवघर पोलिसांनी या प्रकरणी तपास



करून अबरार अहमद मुक्तार शाह, वसीम शाह आणि मोहम्मद सिद्धीकी यांना अटक केली. या टोळीतील अजून तीन आरोपी फरार आहेत. आरोपींकडून ६ लाखांचा मुद्देमाला आणि १४९ पारपत्र जप्त केल्याची माहिती उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे. या टोळीने कुणालाही परदेशात पाठवलेले नव्हते. भाईंदर प्रमाणेच मुंबई, दिल्ली आणि कोलकत्ता राज्यात अशा प्रकारचे कार्यालय थाटून तरुणांची फसवणूक करण्याची त्यांची योजना होती. नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी, पोलीस निरीक्षक अशोक कांबळे (गुन्हे) सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पालवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल तळेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल धायगुडे, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे आदींच्या पथकाने कारवाई करून या टोळीला अटक केली.

# वसईत जागतिक थेलेसेमिया दिवस दणक्यात साजरा

**वसई/प्रतिनिधी**

तब्बल १०० हुन अधिक थेलेसेमियाग्रस्त रुग्णांची सहल आयोजित करण्यात आली होती. जागतिक थॅलेसेमिया दिन, दरवर्षी ८ मे रोजी साजरा केला जातो, थॅलेसेमियाबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी समर्पित आहे. असामान्य हिमोग्लोबिन उत्पादनाद्वारे वैशिष्ट्यीकृत एक अनुवांशिक रक्त विकार. थॅलेसेमिया असलेल्या लोकांमध्ये हिमोग्लोबिन तयार करण्याची क्षमता कमी होते किंवा नसते, ज्यामुळे अशक्तपणा आणि इतर गुंतागुंत होऊ शकतात. थॅलेसेमिया हा रक्ताचा विकार आहे जो मुलांना त्यांच्या पालकांकडून वारशाने मिळतो. या आजारात व्यक्तीच्या शरीरातील हिमोग्लोबिन आणि लाल रक्तपेशी निर्माण करण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम होतो. थॅलेसेमियाचे विविध प्रकार आहेत आणि या आजाराचा उपचार प्रकार आणि तीव्रतेवर अवलंबून असतो. या रोगाचा प्रभाव सौम्य ते गंभीर आणि काही प्रकरणांमध्ये जीवघेणा असू शकतो. थॅलेसेमिया इंटरनॅशनल फेडरेशन




(TIF) ने ८ मे हा आंतरराष्ट्रीय थॅलेसेमिया दिन म्हणून नियुक्त केल्यानंतर १९९४ मध्ये जागतिक थॅलेसेमिया दिन अस्तित्वात आला. जॉर्ज एंगलेझोस आणि इतर सर्व थॅलेसेमिया रुग्ण ज्यांनी या आजाराशी लढा दिला त्यांच्या जीवनाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा करण्यात आला. जॉर्ज एंग्लेझोस हे थॅलेसेमिया इंटरनॅशनल फेडरेशनचे संस्थापक पॅनोस एंग्लेझोस यांचे पुत्र होते. थॅलेसेमिया वर कार्यरत असणारे रक्तमित्र संस्था संघटनाचे पदाधिकारी गजानन नार्वेकर, गणेश अमसोडकर, संगीता वाधवा यांनी सदर सहलीचे आयोजन केले होते. स्वतः संगीता वाधवा या थेलेसेमिया ग्रस्त असून या रुग्णांसाठी हिरारीने काम करत आहेत. या उपक्रमासाठी रिद्धिविनायक हॉस्पिटल व जिल्हा परिषद पालघर आरोग्य विभाग यांनी वैद्यकीय पथकाच सहाय्य देऊ केले होते. मांडवी हिल्स रिसॉर्ट चे प्रवीण पाटील यांनी सवलतीत त्यांचा रिसॉर्ट उपलब्ध करून दिला. आमची वसई रुग्णमित्र राजेंद्र ढगे व रुग्णमित्र विनोद साडविलकर यांनी उपक्रमाची सांगता करत थेलेसेमिया ग्रस्त रुग्णांना निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

# पोलीस आयुक्तालयाला नऊ वॉटर प्युरिफायर भेट




**सोलापूर/प्रतिनिधी**

कॅन फिन होम्सकडून सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाला नऊ वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आले कॅनरा बँकेचे सहकार्याने कॅन फिन होम्सकडून सोलापूर पोलीस आयुक्तालयाला नऊ वॉटर प्युरिफायर देण्यात आले. सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. व्यवस्थापक संतोष नेकार आणि अधिकारी प्रतीक पालमपल्ले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस उपायुक्त अजित बोराडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, शरद बारवकर आदी उपस्थित होते. सोलापूर शहरातील सात पोलीस ठाणे व सोलापूर शहर आयुक्तालय आणि महिला तक्रार निवारण केंद्र या ठिकाणी हे वॉटर प्युरिफायर बसवण्यात येणार आहेत.

# राजमाता जिजामाता संकुलात महाराष्ट्रदिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात महाराष्ट्रदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून महाराष्ट्र निर्मिती लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, प्राचार्य गणपत मुंडे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, महाराष्ट्र हे शूर-वीरांचे राज्य आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचा वारसा असलेले राज्य आहे. महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक होऊन गेले. आपल्या महाराष्ट्र राज्याला सांस्कृतिक वारसा लाभला आहे. महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले असे अनेक युगपुरुष लाभलेले आहेत. महाराष्ट्राला अनेक संत-महापुरुष लाभले आहेत, हे आपले भाग्य आहे. महाराष्ट्राने शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, चित्रपट, संगीत, विज्ञान, तंत्रज्ञान आदि क्षेत्रात उत्कृष्ट भरारी घेतली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी अनेकांनी बलिदान दिले आहे, त्यांचे स्मरण करून सर्वांनी त्यांना अभिवादन केले पाहिजे, असे सांगून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे नाव आणखी उज्ज्वल करावे, असे आवाहन प्राचार्य केंद्रे यांनी केले. सूत्रसंचालन राजीव मुंढे यांनी केले. यावेळी संकुलातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




# पावणे दोन कोटींची रोकड सापडली

**मुंबई/प्रतिनिधी**

कुर्ला पश्चिम येथे मंगळवारी रात्री नाकाबंदीदरम्यान एटीएमसाठी रोकड घेऊन जाणारी एक गाडी पोलिसांनी ताब्यात घेतली. या गाडीत पोलिसांना पावणेदोन कोटी रुपये रोकड सापडली. विनोबा भावे नगर पोलिसांनी सदर गाडी आणि दोन व्यक्तींना ताब्यात घेतले असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या सर्वच ठिकाणी पोलिसांनी नाकाबंदी केली असून ठिकठिकाणी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. विनोबा भावे नगर पोलिसांनी कुर्ला पश्चिम परिसरात मंगळवारी मध्यरात्री नाकाबंदी केली होती. त्यावेळी तेथे एटीएमसाठी रोकड नेणारी एका गाडी आली. या गाडीत दोनच इसम असल्याने पोलिसांना संशय आला. त्यांनी तत्काळ गाडी बाजूला घेण्यास सांगितली. त्यानंतर पोलिसांनी गाडीची तपासणी केली असता त्यात पावणेदोन कोटी रुपयांची रोकड आढळली. विनोबा भावे नगर पोलिसांनी अधिक चौकशीसाठी संबंधित गाडी ताब्यात घेतली. त्यानंतर पोलिसांनी या घटनेची माहिती आयकर विभाग आणि निवडणूक अधिकाऱ्यांना दिली. याप्रकरणी अधिक तपास करण्यात येत आहे.

# म्हैसलगी येथे नदीत बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील म्हैसलगी येथे घरापासून सुमारे ४०० मीटर अंतरावर असलेल्या भीमा नदी पात्रात कपडे धुण्यासाठी आईसोबत गेलेल्या चिमुकल्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. फिर्यादीची लहान बहिण आरती भीमराव निकंबे (वय १४) व भाची रूपाली कुमार माने (वय ८ रा.म्हैसलगी ता.अक्कलकोट) अशी मृत झालेल्या दोन चिमुकल्यांची नावे आहेत. याबाबत किरण भीमराव निकंबे यांनी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास फिर्यादीची मोठी बहीण शोभा कुमार माने लहान बहीण आरती निकंबे व भाची रूपाली माने या तिघीजण घरात शेजारीच असलेल्या भीमा नदीच्या पात्रातील पाण्यात कपडे धुण्यासाठी गेले होत्या थोड्याच वेळात फिर्यादीची मोठी बहीण शोभा माने ही मोठमोठ्याने ओरडुन नदीपात्राकडे येण्यासाठी हाका मारू लागले. त्यावेळी किरण, गावातील सिद्धाराम बराणपुरे, दशरथ शिंगे, अनिल कोळी, कोंडीबा भुई हे सर्वजण नदीपात्रात गेले असता तिने सांगितले की कपडे धुत असताना मुलगी रूपाली ही खेळत खेळत पाण्यात जाऊन बुडू लागले. त्यावेळी त्याला वाचवण्यासाठी आरती ही पाण्यात गेली असता दोघीही पाण्यात बुडाल्या तेव्हा गावातील कोळी व भुई या दोघांनी पाण्यात उडी मारली कोळी याने आरती हीच पाण्यातून बाहेर काढले व भुई याने रूपाली हिला पाण्यातून बाहेर काढले त्यानंतर दोघींना उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी दोघेही उपचारापूर्वीच मूर्त झाल्याचे सांगितले. अधिक तपास हवालदार सिद्राम धायगुडे हे करीत आहेत. फिर्यादीची मोठी बहीण शोभा माने राहणार हंजगी हिची मुलगी रूपाली ही लहानपणापासूनच म्हैसलगी येथे मामाकडेच राहण्यास आहे शोभा ही गावातील यात्रेकरिता मागील १५ दिवसापासून म्हैसलगी येथे आली होती.

# बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयत फळ वाटप



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्त देवणी येथील ग्रामीण रुग्णालयत फळ वाटप करण्यात आले. यावेळी डॉ.पताळे बी एम. स्टाफनर्स बिडवे डी बी, सोनकांबळे यशवंत, नेहा कांबळे वंचित बहुजन आघाडी देवणी शहराध्यक्ष बळीराम बनसोडे उपाध्यक्ष पांडुरंग कांबळे प्रा. नरसिंग सूर्यवंशी, रावळे एच.एम. पाटिल, आर.एस. शाहीर डी एन कांबळे, दिलीप शिदे, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, जयभीम देवणीकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मामाच्या घरी पळून गेलेल्या पाच मुलांना पोलिसांनी शोधले

**पनवेल/प्रतिनिधी**

कळंबोली येथील फूडलॅण्ड कंपनीजवळील आदिवासी वाडीतून पाच मुलांचे अपहरण झाल्याची तक्रार एका आदिवासी महिलेने पोलिसांकडे सोमवारी रात्री केली होती. या मुलांचा शोध घेण्यासाठी सोमवारी रात्री ते मंगळवारी दिवसभरात तीन वेगवेगळी पथके शोध घेतल्यानंतर ही मुले करंजाडे येथील मामाच्या घरात झोपल्याचे पोलिसांना आढळले. मात्र पोलिसांना पाहून पळून गेलेल्या पाच पैकी दोन मुले पुन्हा शिरढोण येथील त्यांच्या नातेवाईकांकडे लपली होती. अखेर मंगळवारी उशीरा त्यांनाही सुरक्षित कळंबोली पोलिसांनी शोधून काढून पालकांच्या स्वाधीन केले. मागील चार महिन्यांपूर्वी नवी मुंबईतून मुलांना उचलून घेऊन जात असल्याची अफवा पसरविण्यात आली होती. त्यानंतर नवी मुंबई पोलिसांकडून याबाबतचे स्पष्टीकरण दिल्यानंतर नवी मुंबईतील पालकांना दिलासा मिळाला. अशाच एका घटनेमुळे पुन्हा मुलांच्या अपहरणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. पालकांना काही न सांगता घराबाहेर राहणाऱ्या मुलांमुळे हा प्रसंग घडला आहे. मागील आठवड्यात गुरुवारपासून ते शनिवारपर्यंत घराबाहेर गेलेली मुले घरी न परतल्याने रोडपाली फुडलॅण्ड कंपनीजवळील आदिवासी वाडीत राहणाऱ्या ३७



वर्षीय ताई वाघे यांनी त्यांच्या मुलीसह अजून चार मुलांचे अपहरण झाल्याची तक्रार कळंबोली पोलीसांत सोमवारी रात्री दिली. कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांनी या गंभीर प्रकरणातील मुलांच्या शोधासाठी एक अधिकारी व चार कर्मचारी नेमले होते. ताई वाघे यांच्यासह त्यांचे नातवाईक व पोलीसांचे पथक मुलांच्या शोधासाठी त्यांच्या नातेवाईकांच्या घरी शोध घेत होते. पेणधर, तळोजा, शिरढोण असे नातेवाईकांच्या घरी शोधल्यानंतर करंजाडे येथील एका नातेवाईकाचे घर शोधल्यावर ही मुले पोलीसांना झोपलेल्या अवस्थेत सापडली. मात्र यामधील दोन मुलांनी त्यांना शोधायला पोलीस आल्याचे पाहिल्यावर तेथून पळ काढून धूम ठोकली. मंगळवारी ही मुले शिरढोणच्या नातेवाईकांकडे सापडली. १५ ते १६ वर्षे वयोगटातील ही मुले असून यामध्ये ४ मुली व १ मुलाचा समावेश आहे.

13 TO 19 MAY 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2024 8:45 PM Page 1



# मुंबई तर हातची गेलीच आता कोकणही परप्रांतीयांच्या हाती जाणार

आज जी अवस्था मुंबईमध्ये मराठी माणसाची आहे, तीच अवस्था कोकणात ही कोकणी माणसांची आहे. कारण यापूर्वी मुंबईवर परप्रंतियांचे लोंढे आदळत होते. पण आता कोकणावर ही परप्रांतीयांचे लोंढे आदळत आहेत. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाचही जिल्ह्यांमध्ये युपी बिहारी, गुजराती आणि मारवाडी लोकांनी घुसखोरी केलेली आहे. ज्याप्रमाणे मुंबईत तिथला स्थानिक भूमिपुत्र पैशाच्या लालसेने आपले घर विकून मुंबईच्या बाहेर स्थायिक होत होता. अगदी तशीच परिस्थिती कोकणात सुरू आहे. कोकणातील गरीब माणसांच्या जमिनी परप्रांती व्यापलेल्या आहेत. गुप्ता, दुबे, यादव, वादवाने, सिधवानी, पटेल, मेहता या लोकांनी कोकणात जागा घेऊन स्वतःचे उद्योगधंदे निर्माण केलेल्या आहेत. आणि तिथला गरीब माणूस या परप्रांतीय उद्योजकांकडे नोकरी करीत आहे. त्यामुळे आमच्या निसर्ग रम्य कोकणाचे पुढे काय होणार? याचीच चिंता लागून राहिलेली आहे. तसे पाहता कोकणी माणूस कर्मदरिद्री आहेत. कोकणावर निसर्गाने चौफेर उधळण केलेली आहे. जर कोकणी माणसाने सरकारच्या मागे लागून कोकणातला पर्यटन व्यवसाय विकसित केला असता, आणि त्यात आपली भागीदारी ठेवली असती, तर आज कोकणी माणसाला मुंबईत येऊन नोकरी करण्याची आवश्यकता भासली नसती. कोकणी माणसाने कोकणात येणारे केमिकल उद्योग आणि तशाच प्रकारच्या इतर उद्योगधंद्याला विरोध करण्यात आपली एनर्जी खर्ची करण्यापेक्षा, आपल्या हक्काच्या लाल मातीत आपला स्वतःचा उद्योग धंदा सुरू करण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करायला हवा. आज कोकणातल्या जमिनी कवडीमोल भावाने परप्रांतीय व्यापारी विकत घेत आहेत. आणि कोकणी माणूस हळूहळू कोकणातून बाहेर फेकला जात आहे. इतकेच नव्हे तर आता कोकणात मोठ्या प्रमाणावर बिहारी आणि बंगाली मजूर दिसत आहेत. अगदी बांधकाम व्यवसायापासून, हॉटेल व्यवसायापर्यंत सर्वत्र बिहारी मजूर बघायला मिळत आहेत. त्यांना कोकणी भाषा येत नसली, तरीही ते चिकाटीने कोकणात काम करीत आहेत. त्यामुळे आता कोकणी माणसाला त्याच्या कोकणात मजुरी सुद्धा मिळेनाशी झालेली आहे. नजीकच्या काळात ज्याप्रमाणे मुंबईतून मराठी माणूस हद्दपार झाला. अगदी तशीच परिस्थिती कोकणातील कोकणी माणसावर येणार आहे. कोकणातला आंबा कोकणातील शहरांमध्ये युपीचे भैय्या आणि बिहारी लोक विकताना पाहिल्यावर प्रचंड वेदना होतात. एक कोकणी माणूस म्हणून आपण कुठे चुकलो आणि ही चूक सुधारण्यासाठी काय करायला हवे, याचा विचार करावा लागत आहे. मुंबई आपल्या हातातून केव्हाच गेली. पण आता पृथ्वीवरील दुसरा स्वर्ग अशी ओळख असलेले आमचे कोकण सुद्धा आमच्या हातातून जाते की काय? असे वाटायला लागले आहे. आमचे कोकणी पुढारी फक्त निवडणुकीच्या काळात दिसतात. इतर वेळी ते कुठे गायब असतात ते त्यांचं त्यांना ठाऊक. पण आपण जेव्हा भावनेच्या भरात अशा लोकांना निवडून देतो. तेव्हा मात्र पाच वर्ष पश्चाताप करण्याची पाळी येते. आज कोकणचा विकास कोणामुळे थांबला यावर वाद घालण्यापेक्षा, भविष्यात कोकणातला माणूस कोकणातच कसा टिकून राहील, यासाठी काय करता येईल, याचा विचार इथल्या सगळ्याच राजकीय पक्षातील कोकणी नेत्यांनी करायला हवा .या कोकणात उद्योगधंदे येण्यासाठी चांगल्या इन्फ्रास्ट्रक्चर ची आवश्यकता आहे. परंतु मुंबई गोवा महामार्ग १७००० कोटी खर्च येऊनही अजून पूर्ण झालेला नाही. जर मुख्य रस्त्याची ही अवस्था, तर कोकणातील गावा गावाला जोडणाऱ्या इतर रस्त्यांची काय स्थिती असेल याचा विचारच करायला नको.आजही कोकणातील काही दुर्गम खेड्यांमध्ये डांबरी रस्ते नाहीत. त्यामुळे ७५ वर्षाच्या स्वातंत्र्याच्या काळात, कोकणी माणसाने मुंबईसारख्या महानगरात राहून, पैसा कमवून, आपल्या कोकणासाठी काय केले असा प्रश्न विचारावासा वाटतो. कोकणात अजूनही खूप काही होऊ शकते. कोकणाचा कायापालट कोकणी माणसासाठीच व्हायला हवा. असे प्रत्येकाला वाटते. पण त्यासाठी कोकणी माणसाने एकजूट दाखवायला हवी. अन्यथा कोकण रेल्वे सारखी परिस्थिती निर्माण होईल. खरे तर कोकण रेल्वेसाठी आमच्या गरीब कोकणी माणसाच्या जमिनी गेल्या. पण त्याचा फायदा कोणाला झाला? तर दक्षिणेतील राज्याना! तिथल्या लोकांना कमी वेळेत आणि कमी पैशात आपल्या गावी जाता येते. खरंतर कोकणी मासाच्या या उपकाराची दक्षिण भारतीयाने जाणीव ठेवायला हवी होती. कारण कोकणी माणसांनी जमिनी दिल्या म्हणून कोकण रेल्वे झाली. पण आज मत्स्यगंधा, नेत्रावती, एर्नाकुलम, राजधानी यासारख्या मोठ्या एक्सप्रेस गाड्या, कोकणातील अगदी एक-दोन रेल्वे स्थानकातच थांबतात. इतर रेल्वे स्थानकात थांबत नाहीत. मग आमच्या जमिनी घेऊन काय फायदा? हा कोकणावर एक प्रकारचा अन्याय आहे. म्हणूनच कोकणी माणसाने कोकणात येणाऱ्या केमिकल प्रकल्पांवरून एकमेकांशी वाद न घालता, कोकणच्या विकासासाठी झगडावे. कोकणावर आढळणारे परप्रांतीयांचे लोंढे रोखण्यासाठी पुढे यावे, हीच खरी काळाची गरज आहे.

# मतदान जनजागृतीसाठी स्वीप मार्फत विविध उपक्रम

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील मतदारांमध्ये जनजागृती करुन मतदानासाठी प्रवृत्त करणे आयोगाकडील स्थायी सुचना आदेशांची अंमलबजावणी करणे व नागरिकांमध्ये निवडणुक विषयी जनजागृती करण्यासाठी SVEEP (Systematic Voters Education Program) जिल्हा स्तर व सर्व विधानसभा मतदार संघनिहाय मोहिम राबविण्यात आलेल्या आहेत.

**निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करणे** (ELC)

आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने विद्यार्थामध्ये निवडणूकी विषयी माहिती मिळून साक्षर व्हावी याकरीता मा. भारत निवडणूक आयोगाने सर्व विद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळाची (Electoral Literacy Club) स्थापन करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार २२ पालघर लोकसभा मतदार संघामध्ये 673 ELC मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार एडउ मंडळांनी महाविद्यालयामध्ये निवड केलेले कँपस अँबेसिडर यांचेमार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी शिबीर, निवडणूकीत मतदान करण्याविषयी प्रचार प्रसिद्धी इत्यादी उपक्रम निवडणूक साक्षरता मंडळ (ELC) मार्फत घेण्यात आलेले आहेत. तसेच नविन, भावी मतदारांना त्यांची मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी विविध महाविद्यालयांत शिबीरे आयोजित करण्यात आली.



**पालघर महासंस्कृती महोत्सव कार्यक्रम**

पालघर जिल्ह्यात दि.०७/०२/२०२४ ते ११/०२/२०२४ या कालावधीत महासंस्कृती महोत्सवामध्ये SVEEP ctivity अंतर्गत जनजागृती करुन मतदानासाठी प्रवृत्त करणेकामी SVEEP वर आधारीत पथनाट्य आयोजित करण्यात आले. सदर महोत्सवात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदविली होती.

**संकल्प पत्र**

दि.१९/०३/२०२४ ते दि. १५/०४/२०२४ या कालावधीत संकल्प पत्र ची संकल्पना राबविण्यात आली असुन जिल्ह्यातील २,९९२ शाळांना ६,८६,४०३ संकल्प पत्र वाटप करण्यात आली व सर्व विदयार्थ्याकडून परिपूर्ण प्रपत्र भरुन ६,१२,८४७ तालुकास्तरावर प्राप्त झाली आहेत. सदर संकल्पपत्रामुळे भविष्यातील पिढीही जागृत होईल व पालकांनाही मतदानाचे महत्व लक्षात यईल, तसेच लहान मुलांचा बालहट्ट पुरविण्यात पालक पुढाकार घेऊन मतदान करण्यात प्रवृत्त होतील असा विश्वास जिल्हा प्रशासनास असुन प्रत्येक विदयार्थ्या किमान सरासरी २ पालकांपर्यत पोहचले असून, जिल्ह्यातील १३,७२,८०६ मतदारापर्यत पोहचण्यात व जनजागृती करण्यात जिल्हा प्रशासनास यश आले आहे.

**मानवी साखळी (रांगोळी)**

मतदानाची टक्केवारी वाढावी, मतदानांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने दिनांक २८/०३/२०२४ रोजी स.तु.कदम शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्याची भारत देशाचा नकाशा (मानवी रांगोळी १५० फुट १३० फूट आकाराची तयार करण्यात आली. एकुण ७५० विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने मानवी साखळी (रांगोळी) माध्यमातून नकाशा साकारण्यात आला. या ठिकाणी १८ ते २० वयोगटातील पालघर व बोईसर महाविद्यालयातील एकुण जवळपास ३,००० विद्यार्थी उपस्थित होते. त्या विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची शपथ घेतली. या कार्याक्रमाची ड्रोनच्या सहाय्याने चित्रीकरण तयार करुन विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रचार प्रसिद्धी करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदान करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले.

Ride For Vote **महिलांची बाईक रॅली**

२२ पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघातील नागरीकांना मतदान करणेकामी दिनांक ०४/०५/२०२४ रोजी सकाळी ८:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे जिल्हयातील विविध आस्थापनावरील महीला अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयामध्ये काम करणाऱ्या विविध महीला अधिकारी, कर्मचारी यांची वाईक रॅली आयोजीत करण्यात आली होती त्यमध्ये बाईक रॅलीचा मार्ग हा जिल्हाधिकारी कार्यालय पालघर ते पाचबत्ती हुतात्मा स्तंभ या मार्गावर बाईक रॅली मध्ये किमान ५०० महीला सहभागी होऊन या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

Run For Vote **मॅरेथॉन**

२२ पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघातील नागरीकांना मतदान करणेकामी प्रवृत्त करणेच्या दृष्टीकोनातून दिनांक ०५/०५/२०२४ रोजी सकळी ६.०० वाजता पाचबत्ती हुतात्मा स्तंभ पासून ३ किमी, ५ किमी व १० किमी मॅरेथॉन सुरुवात व त्याच ठिकाणी समाप्ती असे मॅरोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पालघर जिल्हयातील शाळा कॉलेजमधील युवा व युवती, जेष्ट नागरीक, क्रिडा संस्था, विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, पोलीस, स्काऊड गाईड, NCC, NSS, विद्यार्थी तसेच विविध वयोगटातील सर्वसामान्य नागरीक देखिल सहभागी झाले होते.

**जाहिरात प्रचार-प्रसिद्धी** (Flex / audio / Video)

२२ पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघातील नागरीकांना मतदान करणेकामी प्रवृत्त करणे, राष्ट्रीय कर्तव्य भावना जागृत करणे इत्यादीसाठी सर्व मतदार संघांनी SVEEP activity अंतर्गत शहरी/ग्रामीण भागात विविध पोस्टर्स, स्टिकर्स, बॅनर्स याद्वारे मतदान प्रचार प्रसिद्धी करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. स्थानिक पातळीवर गर्दीच्या ठिकाणी व आठवडे बाजारामध्ये तसेच महानगरपालिका यांचेमार्फत त्यांच्या बसेस, विविध रेल्वे स्थानक, मॉल, मल्टीप्लेक्स, चित्रपटगृह, बँका व पोस्ट ऑफिस इत्यादी ठिकाणी पोस्टर्स, होडीग, बॅनर, Selfie कट आऊट अशा विविध माध्यमांमार्फत प्रचार प्रसिद्धी करण्यात आली. त्याचप्रमाणे गर्दीच्या ठिकाणी उदा. जिल्ह्यातील विविध यात्रेच्या ठिकाणी जिल्हा कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेले ऑडीओ /व्हिडीओ) चालविण्यात येत आहे. तसेच जिल्ह्यातील जिल्हा आयकॉन यांना मतदान करण्याचे आवाहन करण्याबाबतचे रेकॉर्ड केलेल व्हिडीओ बाईट घेण्यात येऊन त्यांच्या संदेशाद्वारे मतदारांमध्ये मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आलेले आहे.

**मतदान केंद्र पातळीवर टीमच्या गृहभेटी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी गृहभेटी हा उपक्रम राबविणेबाबत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदरशक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार गृहभेटी या उपक्रमासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघ निहाय मतदान केंद्र स्तरावर इङ्ज, अंगणवाडीसेविका व मदतनीस, आरोग्यसेविका व आशासेविका, ग्रामसेवक, पोलिस पाटील, तलाठी, महानगरपालिकेच्या नियोजन विभागाचे कम्युनिटी ऑर्गनायझर (CO), कर निर्धारण आणि संकलन विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी व अधिकारी, इ. नुसार टीम तयार करण्यात आलेली आहे. या गृहभेटी ५०% पेक्षा कमी मतदान झालेल्या भागात प्राधान्याने करण्यात येणार आहेत. सदर टीम यांनी मुख्यत्वे करुन दि.११/०५/२०२४, दि.१२/०५/२०२४ तसेच दि.१७/०५/२०२४ व दि.१८/०५/२०२४ रोजी मतदान केंद्राच्या क्षेत्रात गृहभेटी देण्याचे नियोजन केलेले आहे. या उपक्रमांतर्गत मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणे अपेक्षित आहे. गृहभेटीमध्ये लोकशाही शासनव्यवस्था अबाधित राहण्यासाठी मत देणे किती महत्त्वाचे आहे; मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य असून त्यामुळे देशाचा आणि आपला (मतदारांचा) कसा फायदा होणार आहे, हे सांगून मतदारांमधील उदासीनता दूर करण्याचा प्रयत्न करणे, हे मतदान केंद्र पातळीवर तयार करण्यात आलेल्या टीमचे मुख्य काम आहे.

**इतर जनजागृती उपक्रम**

राज्याची सरासरी मतदान टक्केवारी पेक्षा कमी होणाऱ्या मतदान केंद्रावर विशेष लक्ष केंद्रीतच करून भौगोलिक परीस्थितीशी अनुरूप स्थानिक पातळीवर पथनाट्य करणे, मानवी साखळी उपक्रम राबविणे, PWD Chain मोटारसायकल रॅली तसेच विविध शालेय/महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांमार्फत मतदान जनजागृती करणेकरीता प्रभातफेरीचे आयोजन, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, ठशशश्र स्पर्धा इत्यादी उपक्रम युवा मतदरांना प्रोत्साहित करण्यासाठी राबविण्यात आलेले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व महिला बचत गटामार्फत मतदार जनजागृती करण्याचे काम देखिल सुरु असून, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, मदतनिस, ग्रामसेवक, तलाठी, पोलिस पाटील तसेच शासन स्तरावरील सर्व कार्यालये देखिल मतदार जनजागृती मध्ये सहभागी झाले आहेत.

जगातील सर्वात मोठा लोकशाही म्हणून मानला जाणाऱ्या भारत देशामध्ये यंदा लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव साजरा करण्यात येत आहे. मतदार राजाला लोकशाहीने जो मतदानाचा हक्क दिला आहे तो मतदान करून बजवावा येणाऱ्या दि.२० मे २०२४ रोजी २२-पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघाकरीता मोठ्या प्रमाणावर मतदान करा असे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद बोडके यांनी पालघर जिल्ह्यातील नागरीकांना केले आहे.

# एका उत्तमाची निवृत्ती...

काही नाती नियंता नियोजित करीत असतो. आपण करू म्हणून ती होत नाहीत. की खटपटून जुळत नाहीत. त्यासाठी भाग्य लागतं. ते तळहातावरच्या रेघांत असतं असंही नसतं. ती रेखा काळजावरच कोरलेली असते. जन्मासोबत. आमच्या कुटुंबातील उत्तमराव पांचाळ सर यांचा आयुष्य प्रवेश असाच विधिलिखित. लेक अमृताच्या रूपानं. उत्तमराव आमचे व्याही. इवाई हो आपल्या भाषेत. आज उत्तमराव सर निवृत्त होत आहेत. अडतीस वर्षं शिक्षक, गट समन्वयक, मुख्याध्यापक म्हणून निष्ठेने अक्षरसेवारत राहून आणि आज केंद्रप्रमुख पदावरून कृतज्ञभावाने ते सेवानिवृत्त होताहेत.काहीसे अबोल वाटणारे पण विषय आणि संदर्भ गवसतो तेव्हा मनमोकळ्या गप्पा होतात. नाहीतरी दोन व्याह्यांची चर्चा तशीही काय असणार! लेकरांच्या ख्यालीखुशाली, तब्येतीची विचारपूस, नवीन काही शासननिर्णय वगैरे किंवा मग काही पाऊस पाण्याच्या गोष्टी. सहसा आम्ही सकाळी सकाळी फिरायला जाण्याच्या वेळी फोनवर बोलत असतो. ते कधी फिरून येत असतात आणि मी निघालेला असतो तेव्हा. अमृताच्या लग्नाच्या संदर्भात आम्ही पहिल्यांदा बोललो तेव्हाच सरांच्या बद्दल एक प्रकारचा आदर निर्माण झाला होता.लेकीच्या पत्रिकेत मंगळ (की अमंगळ!) अवतरला होता. तसा बऱ्यापैकी परिवर्तनवादी मी. तरीही कुटुंबातील आग्रहामुळे पत्रिका तयार करून घेतली. तीही तीन वेगवेगळ्या लोकांकडून. लग्नासाठी शोधकार्य सुरू झालं तेव्हा मध्येच हा मंगळ मुंडी वर करायचा. मुलीचा बाप असणं काय असतं याचा चांगलाच अनुभव गाठीशी बांधून घेतला होता. शोध लागल्यानंतर आधी आपण मुलाच्या घरी शिदोरी देऊन मुलीला पाहण्यासाठी निमंत्रण देऊन यायचं. मुलगा आणि मंडळी घरी येऊन मुलगी पाहून जाणार. नंतर आपण निरोपाची वाट पाहत बसणार. एकूणच ताण येणारं सगळं.नंतर हेच समोर वाढून ठेवू नये म्हणून मी आधीच सरांना कल्पना दिली. त्यावर ते बोलले तिथून हा आदरभाव निर्माण झाला. सामान्य कुटुंबातील हा माणूस किती विज्ञाननिष्ठ आहे याचं नवलही वाटलं. मी पत्रिका वगैरे पाहत नाही आणि मानतही नाही असं त्यांनी म्हटल्यावर मी खूप निर्धास्त झालो. पुढे मग सगळं यथासांग झालं. त्यांचा मानपान राखून घडलं तसं लेकीचा लग्न सोहळा पार पडला. जावई नितीनकुमार हे आमच्या कुटुंबातील नवीन सदस्य झाले. सरांच्या सौभाग्यवती सौ. संगीताताई या आदर्श गृहिणी. मंदसं स्मित चेहऱ्यावर कायम विलसत असणाऱ्या. सरांसह सर्वांचीच जिवाजतन काळजी घेणाऱ्या. लेक अमृता सरांच्या कुटुंबवत्सलपणाबद्दल खूप अभिमानानं सांगते. पप्पा कधीच रागवत नाहीत, पप्पा ताटात जे वाढलं ते आनंदाने खातात वगैरे. सचिन आणि नितीन ही सरांची गुणवान मुले. आईवडिलांच्या संस्कारात वाढलेले आणि तो वारसा जपणारे. आईवडिलांच्या कष्टाची, त्यागाची जाणीव ठेवणारे. सरांच्या आयुष्यातील मेहनतीचे चीज करणारे. सुखी समाधानी कुटुंबाची व्याख्या पूर्ण करणारं हे कुटुंब. आदिती (सानू) आणि अवंती ही या कुटुंबातील गोड फुले. सानूचा लळा तर सर्वांनाच. इतका की तिच्यासाठी आम्ही खंड्या (पोपट) घरी आणला. पिंजऱ्यातला. सानूचं आणि खंड्याचं व्हाट्सअप व्हिडिओ कॉल वरून मजेशीर संभाषण चालायचं. सर त्यांच्या कुटुंबातील नोकरीला लागलेले पहिले व्यक्ती. शासकीय नौकरी मिळाल्यानंतरही त्यांनी आपलं शिक्षण चालू ठेवलं. बहिस्थ विद्यार्थी म्हणून एमएबीएड पर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं. म्हणूनच सेवेच्या अखेरच्या टप्प्यात का होईना त्यांना केंद्रप्रमुख म्हणून पदोन्नती मिळाली. या सेवाकाळातील त्यांचे कितीतरी विद्यार्थी चांगल्या पदावर नौकरीला लागले. डॉक्टर इंजिनिअर झाले. खाजगी क्षेत्रातील नामवंत कंपनीत कामाला लागले. सरांचा गोतावळा मोठा. शासकीय राजकीय क्षेत्रातील मोठी माणसं त्यांच्या गणगोतात आहेत. त्यांच्या गणगोतातील प्रदीप गोडसे आणि विनोद साळुंखे हे आमचे समान मित्र. आमच्या ऋणानुबंधात प्रदीपचा सहयोग खूप मोलाचा.सरांनी शिक्षक, मुख्याध्यापक असताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले. जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमातून विविध प्रकारचे प्रशिक्षण घेतले -दिले. जनजागृतीची मोहीम म्हणून सापांनाही अंगाखांद्यावर लीलया खेळवलं. पर्यटन हा त्यांचा आवडता छंद. कधी ताईंसह तर कधी मित्रांसह बरीचशी भटकंतीही त्यांनी केलीय. आजवरच्या सेवाकाळातील निस्पृह योगदानाचा वेळोवेळी सन्मान राजमान्य पावला. तालुका, जिल्हा गुरुगौरव पुरस्काराने त्यांच्या विद्यार्थी सेवेचा गौरव झाला. तर उत्तमराव सर आज प्रदीर्घ अशा सेवेनंतर निवृत्त होत आहेत. ही सेवानिवृत्ती केवळ एका कर्मचाऱ्याची नाही. तर तहहयात निष्ठेने विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या, आपल्या नौकरीला बांधिलकीच्या श्रद्धाभावातून जपणाऱ्या एका ध्येयवेड्या विज्ञाननिष्ठ, पर्यावरणवादी, समर्पित जगण्याची निवृत्ती आहे. सहसा आपलं नाव आणि जगणं यामध्ये एकरूपता फार दुर्मीळ. सर मात्र त्यांच्या नावासारखेच उत्तम! याही अर्थाने ही एका उत्तमाची निवृत्ती! सरांना मातीचा लळा आहे. निवृत्तीनंतर रानातल्या आणि घरातल्या झाडापानाफुलांशी बोलायला त्यांना निरामय आयुष्य लाभावं इतकीच निर्मिकाकडे प्रार्थना...



**- व्यंकटेश चौधरी, नांदेड**

# 'सिमी' ही बेकायदेशीर संघटना; त्या संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश!

**पालघर/प्रतिनिधी**

केंद्र शासनाने त्यांच्या अधिसूचना क्रमांक ड.ज. ३५४ (ए) दिनांक २९ जानेवारी २०२४ अन्वये बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ कायद्याच्या कलम ३ च्या उप-कलम (१) द्वारे स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (SIMI)ला 'बेकायदेशीर संघटना' म्हणून घोषित केले आहे. तसेच बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ कायद्याच्या कलम कलम ४२ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना केंद्र सरकारने अधिसूचना क्रमांक S.O. ४७५(ए) दि. ५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासन देखील या कायद्याच्या कलम ७ आणि कलम ८ अंतर्गत केंद्र सरकारद्वारे वापरता येणारे अधिकार वापरतील असे निर्देश दिले आहेत.

केंद्र सरकारच्या उपरोक्त पत्रातील सूचनांच्या अनुषंगाने कायद्याच्या तरतूदीनुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने करण्यात यावी तसेच संबंधितांवर न्यायाधिकरणाची नोटीस बजावण्याबाबत तसेच या बंदीबाबत स्थानिक पातळीवर योग्य ती प्रसिद्धी देण्याबाबतही कळविल्याचे जिल्हादंडाधिकारी गोविंद बोडके यांनी कळविले आहे. बेकायदेशीर कृत्ये अधिनियमानुसार स्टुडंटस् इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या संघटनेवर बंदी घालण्यात आली आहे. याविषयीची २९ जानेवारी २०२४ रोजीची अधिसूचना केंद्र सरकारकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

याविषयी राज्य शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे. या कायद्याच्या तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी. तसेच संबंधितांवर न्यायाधिकरणाची नोटीस बजावण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच कार्यवाहीबाबत शपथपत्रे दाखल करून ती राज्य शासनाकडे जमा करण्याचे आदेश शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# गर्दीच्या वेळेत लोकल प्रवाशांना गर्दुल्ले, मद्यपी आणि गजरे विक्रेत्यांचा उपद्रव

**कल्याण/प्रतिनिधी**



सकाळच्या वेळेत प्रवाशांची लोकल पकडण्याची घाई असताना या वेळेतच गर्दुल्ले, मद्यपी आणि मोगऱ्याचे गजरे विक्रेते फलाटावर, लोकलच्या दारात आडवे येतात. अनेक वेळा गर्दुल्ले, मद्यपी लोकलच्या दारात पडलेले असतात. घाईत असलेला प्रवासी वेगाने लोकलमध्ये चढला तर तो लोकल दारातील मद्यपीला ठेचकळत आत जातो. अनेक दिवसांपासून हे प्रकार टिटवाळा, बदलापूर, कर्जत, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाशी, पनवेल लोकलमध्ये सुरू आहेत. रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी या मद्यपी, गर्दुल्ले, गजरे विक्रेत्यांना फलाटाच्या बाहेर अडविणे आवश्यक असते. पण रेल्वे सुरक्षा जवानांची नजर चुकून हे फिरस्ते लोकलमध्ये रात्रीच्या वेळेत चढतात. रात्रभर लोकलमध्ये झोपतात. सकाळच्या वेळेत लोकल प्रवासी सेवेत रुजू झाले तरी या फिरस्त्यांना त्याची खंत नसते. लोकलच्या दारात अनेक वेळा हे फिरस्ते आडवे पडलेले असतात. अनेक प्रवासी दररोज या मद्यपींना ठेचकळून पडतात. काही मद्यपी महिला प्रवाशांचा डब्यात पडलेले असतात. त्यामुळे महिलांना डब्यात अशा परिस्थितीत बसायचे कसे असे प्रश्न अनेक वेळा निर्माण होतात. कामावर वेळेत पोहचतो कधी अशी प्रत्येक प्रवाशांची हुरहुर असते. अशा वेळेत मोगऱ्याची फुले, जाईजुईची फुले यांचे गजरे करून ते विक्रीसाठी घेऊन महिला, मुले नियमित, वातानुकूलित लोकल डब्यात सकाळच्या वेळेत गर्दीत घुसतात. या मुला, महिलांच्या हातामधील टोपल्या आणि त्यांच्या फेऱ्यांचा प्रवाशांना नाहक त्रास होतो. बहुतांशी महिला वर्ग कार्यालयीन वेळ गाठण्याच्या चिंतेत असतो. त्यामुळे विक्रेत्यांच्या गजऱ्यांकडे कोणी ढुंकून पाहत नाही. वातानुकूलित डब्यात मात्र या गजरे विक्रेत्यांमुळे मोगरा फुलांचा दरवळ पसरतो, असे प्रवाशांनी सांगितले. आता शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. त्यामुळे घरी बसण्यापेक्षा अनेक शाळकरी मुले गजरा आणि किरकोळ वस्तू विक्रीसाठी लोकलमध्ये शिरतात. फलाटावर येताना ही मुले आपल्या जवळील वस्तू एका पिशवीत भरतात. लोकलच्या डब्यात चढले की पिशवीतील सामान विक्रीसाठी बाहेर काढतात. त्यामुळे फलाटावरील गस्तीवरील सुरक्षा जवानांना फेरीवाले मुले डब्यात चढतात हे निदर्शनास येत नाही, असे प्रवाशांनी सांगितले. रात्रीच्या वेळेत लोकल कळवा, कुर्ला कारशेडला असतात. त्यावेळी तेथे मद्यपी, गर्दुल्ले असतात. ते रात्रीच्या वेळेत लोकलमध्ये चढून तेथेच पडून राहतात. या लोकल प्रवासी वाहतुकीसाठी सकाळी बाहेर पडल्या की गर्दुल्ले आहे त्या परिस्थितीत पडुनच प्रवास करतात. रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी अशा फिरस्त्यांना फलाटावर रोखण्याची प्रवाशांची मागणी आहे.

## वाडा पोलिसांनी हस्तगत केल्या चोरीच्या दुचाकी



**वाडा/प्रतिनिधी**

मुंबई, जव्हार,कासा व वाडा अश्या विविध ठीकाणाहून चोरीच्या दुचाकी कौसाल्याने हस्तगत करण्यास वाडा पोलिसांना यश आले असून एकूण सहा दुचाकी व तीन दुचाकी चोरांना अटक केली आहे. अगदी कमी वेळात ऐशो आरामात व स्टायलिश जीवन जगण्याच्या हव्यासाने महागड्या दुचाकी चोरून निव्वळ दहा, पंधरा हजार रुपयात विकून विकणाऱ्या तिघांच्या टोळीला वाडा पोलिसांनी सीताफीने अटक केली आहे. एक चोरटा हाथी लागल्याने त्याची चौकशी केली असता इतर दोघांचा तपास लागला व त्यांच्याकडून पाच दुचाकी हस्तगत केल्या. जव्हार येथून एक, कासा येथून एक, मुंबई येथून दोन तर वाड्यातून दोन दुचाकी हस्तगत केल्या आहेत. यात यामाहा कंपनीच्या आर १५ मॉडेलच्या निळ्या रंगाच्या तीन दुचाकी, एक सफेद रंगाची के.टी.एम, एक काळ्या, लाल रंगाची टी.व्ही.एस. स्कुटी तर एक काळ्या रंगाची स्पेंडर आहे. यातील चार दुचाकी प्रत्येकी दोन लाखाच्या आसपास आहेत. वाडा पोलीस ठाण्याचे गुन्हा अन्वेषक पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके व त्यांच्या सहकाऱ्यांनी एगदी कमी वेळेत ही कारवाई केली आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके, पो.हवा. विजय मढवी, पो.शि. संतोष वाघाचौरे, गजानन जाधव, भूषण खिलारे, यांनी ही कारवाई केली आहे. अधिक तपास करता आणखी वाहणे मिळण्याची शक्यता असून, नागरिकांनी आपल्या शेजारी एखादा व्यक्ती महागडी गाडी घेऊन फिरत असेल जी विकत घेण्याची त्याची आयपत नाही, असा संशयित आढळल्यास पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी केले आहे.

## मानवसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून भाईंदरमध्ये १९३ निरंकारी भक्तांचे रक्तदान



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या 'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' या दिव्य शिकवणूकीतून प्रेरणा घेऊन १९३ निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रविवार, दि.५ मे रोजी संत निरंकारी सत्संग भवन, भाईंदर येथे आयोजित रक्तदान शिबिरात संत निरंकारी रक्तपेढीकडून रक्त संकलन करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संत निरंकारी मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक हिम्मतभाई यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी सेवादल क्षेत्रीय संचालक मुकुंद देवे आणि संत निरंकारी रक्तपेढीचे मारुती कासारे आदि उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला आमदार श्रीमती गीता जैन, माजी नगरसेवक ॲड. रवि व्यास, माजी स्थानिक नगरसेवक प्रविण पाटील आणि माजी नगरसेविका श्रीमती रिटा शाह आदि मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांनी संत निरंकारी मिशनच्या मानवसेवेच्या कार्याचे कौतुक केले.

## मतदान टक्केवारी वाढीसाठी महापालिका प्रशासनाने घेतली सामाजिक आणि व्यावसायिक संघटनांची बैठक

**भिवंडी/प्रतिनिधी**




आगामी लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी लोकसहभागाच्या दृष्टीने भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कार्यरत सामाजिक स्वयंसेवी संस्था तसेच व्यावसायिक संघटना यांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. भिवंडी लोकसभा मतदार संघासाठी आगामी २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या लोकसभा मतदारसंघातील भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम हे दोन विधानसभा मतदार संघ भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोडतात. या दोन मतदारसंघात २०१९ अनुक्रमे ४७ व ५३ टक्के मतदान झाले होते. संसदिय लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी ठाणे तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने विविध माध्यमांतून व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात येत आहे. शाळा व महाविद्यालयातून विविध प्रकारच्या स्पर्धा, पत्रलेखन, पथनाटये, वासूदेव, कव्वाली, पोवाडा, होडींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, स्टिकर्स, घंटागाडी, डिजिटल डिस्प्ले, प्रभातफेरी, महिला बचत गटांचे जनजागृतीपर मेळावे, सिनेमागृहे, मोहल्ला कमिटी बैठका, तृतीयपंथीय मतदारांच्या बैठका, गृहभेटी याद्वारे भिवंडी शहरात मतदारांमध्ये जनाजगृती करण्यात येत आहे. यामध्ये स्वयंसेवी सामाजिक संस्थांचा तसेच व्यावसायिक संघटनांची भूमिका महत्वाची ठरणार आहे.स्वयंसेवी समाज संस्थांनी समाजातील सर्व वंचित घटकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी आपल्या उपक्रमांतून प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणे व्यावसायिक संघटनांनी त्यांचे ग्राहक, अशील, सहयोगी सदस्य तसेच त्यांचे कर्मचारी यांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. यासाठी भिवंडी शहरातील सर्व सामाजिक स्वयंसेवी संस्था व व्यावसायिक संघटना यांनी पुढाकार घेवून मतदानाची टक्केवारी वाढविण्यसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले. या बैठकीस मनपा उपायुक्त प्रणाली घोंगे, अजय एडके, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त नितीन पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. बुशरा सय्यद, जायंटस ग्रुप ऑफ भिवंडी, जायंटस ग्रुप ऑफ मेट्रो सहेली संस्थेच्या मनीषा भांगरे, गायत्री परिवार सामाजिक संस्थेचे डॉ.नीरज गुप्ता, हॉटेल असोसिएशन भिवंडी प्रज्वल शेट्टी, इंडियाचे कावेरी तनयारे, एम.एस.व्ही.टी.चे सोनू पंडित,किन्नर अस्मिता संस्थेचे रुमाना अन्सारी,एफ.पी.ए.आय. भिवंडीचे संध्या सोनारकर,अपूर्वा महिला सामाजिक संस्थेच्या निशा सिंह, एफ.एस.डब्लू. (एच.एम.टी.) राजश्री हिरे व राजेश पाठारे उपस्थित होते.

## पालघर येथील सोनोपंत दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य नागरगोजे निवृत्त

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर येथील सोनोपंत दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य गोपीनाथ नागरगोजे यांचा सेवा निवृत्ती समारंभ महाविद्यालयात पार पडला. यावेळी सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी संस्थेचे अध्यक्ष सचिन कोरे, माजी सचिव अशोक ठाकूर, प्राचार्य किरण सावे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक मंडळी हजर होती. नागरगोजे यांनी आपल्या कार्य काळात आपल्या प्राध्यापक सहकाऱ्यांना सोबत घेऊन महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल केली. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी नवनवे शैक्षणिक उपाम राबविले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या व प्राचार्यांच्या सहमतीने त्यांनी महाविद्यालयात विविध उपक्रम यशस्वी केले, असे मान्यवरांनी सांगितले. यावेळी नागरगोजे यांच्या पत्नी वंदना नागरगोजे या स्वत: शिक्षिका असूनही आपल्या पतीच्या दिवसभराच्या कामाच्या जबाबदारीमुळे आपण त्यांना कुटुंबाची अधिक जबाबदारी पार पाडण्यास सांगितले नाही, असे सांगून ते आपले काम जिद्दीने पूर्ण करतात. त्यामुळे त्यांच्याकडून महाविद्यालयाची व त्यांच्या सामाजिक, राजकीय जीवनातील विविध जबाबदार्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्याचे सांगितले. यावेळी नागरगोजेंना शिक्षण पतपेढीतर्फे १२ लाखाचा धनादेश देण्यात आला. त्यांचा महाविद्यालयाने व विविध संस्थांनी यावेळी शाल, श्रीफळ व पुस्तके भेट देऊन सत्कार केला. नागरगोजे यांनी वकीलाचा अभ्यासक्रम देखील पूर्ण केला असून निवृत्तीनंतर सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळीच्या सुरु असलेल्या शैक्षणिक प्रकल्पाची जबाबदारी विनामूल्य कोणतेही वेतन किंवा फायदे न घेता पार पाडणार असल्याचे सांगितले.

## मानखुर्दमध्ये चिकन शॉरमा खाल्ल्याने १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी**



मुंबईमधील मानखुर्दमध्ये एक धक्कादायक प्रकार घडला आहे. येथील महाराष्ट्र नगर परिसरात राहणाऱ्या एका तरुणाचा अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे मृत्यू झाला आहे. या परिसरात राहणाऱ्या काही नागरिकांनी २ दिवसांपूर्वी रस्त्याच्या बाजूला तयार केलेला शॉरमा खाल्ला होता. यामुळे स्थानिकांपैकी १० ते १२ जणांना अन्नातून विषबाधा झाली होती. त्यापैकीच एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. प्रथमेश भोकसे असं मरण पावलेल्या तरुणाचं नावं असून तो १९ वर्षांचा होता. या तरुणाच्या मृत्यूच्या वृत्ताला ट्रॉम्बे पोलिसांनी दुजोरा दिला असून सदर प्रकरणामध्ये गुन्हा दाखल करुन दोघांना अटक करण्यात आली आहे. मानखुर्दमध्ये बेकायदेशीरपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांची संख्या मागील काही काळात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. महाराष्ट्र नगरमध्ये तर अशाप्रकारे अगदी अन्नपदार्थांची खुलेआम रस्त्याच्या बाजूला विक्री करणारे अनेक छोटे स्टॉल रोज लागतात. रस्त्याच्या बाजूलाच स्वच्छतेसंदर्भातील कोणतेही नियम न पाळता अन्नपदार्थ तयार करुन विकले जातात. कमी पैशांमध्ये हे पदार्थ उपलब्ध असल्याने अनेकजण या दुकानांसमोर अगदी ताटकाळत उभं राहून पदार्थंचे सेवन करतात. मात्र अशाप्रकारे उघड्यावर तयार केलेला शॉरमा खाणं एका तरुणाच्या जीवावर बेतलं आहे. महाराष्ट्र नगरमधील एका छोट्या स्टॉलवर शॉरमा खाल्ल्यानंतर अर्ध्या तासाने १० ते १२ ग्राहकांना उलट्या, जुलाब आणि मळमळीचा त्रास होऊ लागला. चिकन शॉरमामधून विषबाधा झाल्यानंतर या सर्वांना त्यांच्या नातेवाईकांनी जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल केलं. काहीजणांना पालिका रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यापैकी ज्यांची प्रकृती स्थिर होती आणि त्यांना फारसा त्रास नंतर जाणवला नाही त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. मात्र, महाराष्ट्र नगरमध्ये राहाणाऱ्या प्रथमेश भोकसेची प्रकृती चिंताजनक होती. त्याला दुसऱ्या दिवशीही त्रास होत होता. त्यामुळेच त्याला थेट केईएम रुग्णालयामध्ये हलवण्यात आलं. या रुग्णालयात उपचार सुरु असतानाही प्रथमेशची प्रकृती खालावत गेली आणि मंगळवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला. ट्रॉम्बे पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेतली असून याबाबत गुन्हा दाखल करत दोन जणांना अटक केली आहे. पोलीस अटक करण्यात आलेल्या आरोपींकडे शॉरमासाठीचं मांस कुठून आणलं होतं, बाकी पदार्थ कुठे बनवले जायचे यासंदर्भातील तपास करत आहेत. उन्हाळ्यामध्ये पाण्याचा अंश अधिक असलेले अन्नपदार्थ लवकर खराब होतात. असे पदार्थ बराच काळ बाहेर ठेवून खाल्ल्यास त्यामधून विषबाधा होण्याची शक्यता असते.

## परदेशातून भारतात मतदान करण्याची सुविधा नसल्याने इच्छुकांना बसणार फटका

**कल्याण/प्रतिनिधी**

परदेशात विविध देशांमध्ये नोकरी, निवृत्तीनंतर आपल्या मुलांकडे परदेशात राहत असलेल्या काही कुटुंबीयांची भारतामधील आपल्या निवास स्थान असलेल्या भागात मतदार यादीत नावे आहेत. अशा परदेशस्थांनी भारतातील लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची इच्छा निवडणूक अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली आहे. अशा प्रकारची कोणतीही सुविधा परदेशातील भारतीय नागरिकांसाठी नसल्याचे निवडणूक विभागाकडून परदेशी भारतीय नागरिकांना कळविण्यात आले आहे. भारताच्या विविध भागातील तरूण नोकरीनिमित्त परदेशात गेले आहेत. काही कुटुंबीय आपल्या मुलाच्या सोबत किंवा काही व्यवसाय, उद्योगानिमित्त विदेशात राहत आहेत. यामधील बहुतांशी मंडळींची नावे भारतामधील मतदार यादीत आहेत. भारतात सध्या लोकसभेच्या निवडणुकांचा महौल आहे. परदेशस्थ नागरिक, भारतीय नागरिकांचे भारतामधील निवडणुकांकडे लक्ष लागले आहे. परदेशात राहत असलेले पण भारतात आपल्या गाव, शहरात राहत असलेल्या मतदार यादीत नाव असल्याने अनेक परदेशी भारतीय नागरिकांनी भारतात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची इच्छा तेथून संपर्क करून निवडणूक अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाकडून माहिती घेऊन परदेशात राहत असलेल्या कोणाही भारतीय नागरिकाला टपाल किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले आहे. काही भारतीय विदेशात गेल्यानंतर लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यामुळे त्यांची कोंडी झाली. अगोदर हे माहित असते तर विदेशात आलो नसतो, असे परदेशस्थ भारतीय सांगतात. जगातील सर्वात मोठी लोकशाही आणि त्या देशाचे आपण नागरिक आहोत, या अभिमानाने परदेशात राहत असलेल्या काही भारतीयांना लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याची खूप इच्छा आहे. त्यांनी विविध प्रकारचे प्रयत्न सुरू करून लोकसभेसाठी मतदान करता येईल का याची चाचपणी सुरू केली आहे. अमेरिका, युरोप, अरब देशातील काही भारतीय नागरिकांनी काही राजकीय पक्षांशी संपर्क करून आम्हाला मतदानासाठी भारतात येण्यासाठी काही साहाय्य होऊ शकेल का, अशी विचारणा केली असल्याचे समजते. आता २० मे रोजीच्या मतदानासाठी भारतात यायचे असेल तर विमानाचे परदेशातून तात्काळ तिकीट काढावे लागेल. यासाठीचा तिकीट खर्च खूप मोठा आहे. हा खर्च निवडणूक काळात करण्यात येत असल्याने राजकीय पक्षांना त्याचा हिशेब निवडणूक आयोगाला द्यावा लागेल. चौकशीचे झंझट मागे नको म्हणून विदेश मतदारांना एक गठ्ठा भारतात मतदानाच्या दिवशी आणण्याचा काही उमेदवार, राजकीय पक्षांचा मनसुबा होता. या विचाराकडे त्यांनी पाठ फिरवली आहे. भारतात मतदार यादीत नाव असलेल्या परदेशातील भारतीय नागरिकांसाठी टपाली किंवा अन्य साधनाने मतदान करण्याची व्यवस्था येत्या काळात भारतीय निवडणूक आयोगाने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परदेशी भारतीय नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## प्रेमजाळ्यात महिलेला अडकवून तब्बल 30 लाखांची फसवणूक!

कल्याण : विचुंबे येथे राहणाऱ्या एका ४२ वर्षीय महिलेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिची ३० लाख रुपयांची फसवणूक ऑनलाईन पद्धतीने केली आहे. गुन्हा नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. विचुंबे येथे राहणारी महिला घरी असताना तीला फेसबूकवरुन संपर्क साधण्यात आला. फेसबूकवरील व्यक्तींने संबंधित महिलेचा विश्वास संपादन केल्यानंतर तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवल्याचे या महिलेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. मार्च ते एप्रिल या दरम्यान ही घटना घडली. सुरुवातीला पैसे, भेटवस्तूंचे आमिष दाखविण्यात आले. आणि विश्वास संपादन झाल्यानंतर भेटवस्तू मिळविण्यासाठी वेगवेगळ्या बँक खात्यात ऑनलाईन पैसे भरणा करण्याचे सांगण्यात आले. पिडीत महिलेची तब्बल ३० लाख ९६ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. नवी मुंबईच्या पोलीस दलाच्या सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गजानन कदम यांच्या नेतृत्वाखालील पथक या प्रकरणात तांत्रिक माहितीच्या आधारे ऑनलाईन भामट्यांचा शोध घेत आहेत.

13 TO 19 MAY 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2024 8:46 PM Page 1



# सीआयएससीई बोर्डच्या दहावीच्या परीक्षेत अनुभूती स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

## अनुभूती निवासी स्कूलचा १०० टक्के निकाल; आदित्य सिंग प्रथम



**निसर्गाच्या सान्निध्यात विस्तारलेली अनुभूती स्कूल इयत्ता ५ वी ते १२ पर्यत पूर्ण निवासी आहे. अनुभूतीमध्ये औपचारिक शिक्षणासोबतच सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातात. ज्यामुळे स्पर्धात्मक जगात अनुभूतीचे विद्यार्थी आपली वेगळी छाप सोडत आहे. स्कूलमध्ये १७ वेगवेगळ्या राज्यातून विविध संस्कृतीचे विद्यार्थी व शिक्षक असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन इथं घडते. प्रत्येक सात विद्यार्थामागे एक शिक्षक असे उत्कृष्ट प्रमाण असल्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता उच्चतम राखली आहे. शिक्षकांनी घेतलेली मेहनत, अनुभवाधारित शिक्षणासाठी आवश्यक ती यंत्रणा उपलब्ध करुन देणारे व्यवस्थापन यामुळेच यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखता आली.'**

**सौ. निशा अनिल जैन,**
**संचालिका, अनुभूती निवासी स्कूल**

**जळगाव/प्रतिनिधी**


दिल्ली सीआयएससीई बोर्डच्या इयत्ता १० वी आयसीएसईचा निकाल जाहिर झाला. यात अनुभूती निवासी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यावर्षीही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. अनुभूती स्कूलमधून आदित्य सिंग हा ९५.४० टक्के गुणांसह प्रथम आला. त्याला गणित याविषयात ९९ गुण प्राप्त झाले. तर इतिहास-भुगोलमध्ये ९७, विज्ञान ९६, इंग्रजी ९०, हिंदी ९५, कला ९० गुण मिळाले. केवल अमित सेवला हा विद्यार्थी ९४ टक्क्यांसह द्वितीय क्रमांक, उत्तरा बरंठ ही विद्यार्थीनी ९२.८० टक्क्यांसह तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेत. अनुभूती निवासी स्कूलमधून ४२ विद्यार्थी परीक्षेत सहभागी झाले ते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यंदाच्या निकालामध्ये ९० टक्क्यांच्यावर पाच विद्यार्थ्यांनी गुण प्राप्त केले तर ८० टक्क्यांच्यावर ११ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विषयानुसार ९० गुणांच्यावर ४४ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. संपूर्ण भारतातून आयसीएसई शाळांध्ये अनुभूती स्कूलने आपला ठसा उमटविला आहे. अनुभूती निवासी स्कूल ही अनुभवाधारीत शिक्षण देणारी सीआयसीएसई पॅटर्नची कान्हदेशातील पहिलीच शाळा आहे. सामाजिक जाणिवेसह संवेदनशील नागरीक घडावे यासाठी विद्यार्थ्यांवर शाळेत पाचवी पासूनच विशेष लक्ष दिले जाते. अनुभूती स्कूलमधून उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षणासह, उद्योजक व उच्च पदांवर आपला सुयश संपादन केले आहे. हे अनुभूती स्कूलच्या यशाचे गमक असून विविध क्षेत्रात विद्यार्थी यश संपादित करीत आहे. वर्षभर शिक्षक व शिक्षकतेतर सहकाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाले. अनुभूती स्कूलच्या संचालक मंडळातील अशोक जैन, अतुल जैन, सौ. निशा अनिल जैन, देबासिस दास यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

# कॉमर्समध्ये तुषार कावरे तर विज्ञान शाखेतून देबर्णा दास प्रथम

दिल्ली सीआयएससीई बोर्डच्या इयत्ता १२ वी आयएससीचा निकाल जाहिर झाला. यामध्ये अनुभूती निवासी स्कूलच्या १२ वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले. स्कूलच्या स्थापनेपासून १०० टक्के निकालाची परंपरा यावर्षीसुद्धा कायम राहिली आहे. सीआयएससीई बोर्डच्या १२ वी इयत्तेत कॉमर्स शाखेतील विद्यार्थी तुषार कावरे हा ९४.५० टक्के गुणांसह पहिला आला. विज्ञान शाखेतून देबर्णा दास ९२.५० टक्के प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली, याशिवाय जेईई मेन्स २०२४ च्या ऑल इंडीया रँकमध्ये देबर्णा दास हिने ५६९६ रँक प्राप्त केले आहे. अनुभूती निवासी स्कूल ही भविष्याशी निगडीत अनुभवाधारीत शिक्षण देणारी स्कूल आहे. सीआयसीएसई या पॅटर्नची कान्हदेशातील पहिलीच शाळा आहे. परस्परांमधील निर्भरता वाढावी, आंत्रपिनर्स निर्माण होणे यादृष्टीने गुणवत्तापूर्ण उपक्रम राबविले जातात. छंद जोपासत वर्षभर होणाऱ्या विविध स्पर्धा, उपक्रमांमध्ये कौशल्य दाखवित विद्यार्थीही यश संपादित करतात. कॉमर्स शाखेत प्रथम आलेल्या तुषार कावरे याला इंग्रजीत ९४, अर्थशास्त्र ९३, अकाऊंट ९२, वाणिज्य ९८, बिजनेस स्टडी ९३ गुण मिळाले आहेत. तर विज्ञान शाखेत प्रथम आलेल्या देबर्णा दास हिला इंग्रजीत ९२, केमिस्ट्रीत ९१, फिजीक्स ८९, बायोलॉजी ९१, गणित ९६ गुण प्राप्त झाले आहेत. भविष्याचे वेध घेत असताना शैक्षणिक अभ्यासक्रमासह आपल्यातील सूप्त कलागुणांना जोपासून विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या आधारे प्राप्त केलेले यश गौरवास्पद आहे. यासाठी विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद, शिक्षकतेतर कर्मचारी यांच्यासह पालकांचेही अभिनंदन होत आहे. अनुभूती स्कूलचे संचालक मंडळ, श्री. अशोक जैन, श्री. अतुल जैन, सौ. निशा अनिल जैन, देबासिस दास यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

# अंगणवाडी शिक्षिका चागूना बाई बालूरे सेवानिवृत्त!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील बोरोळ येथील शिवाजी शिवाजीनगर तांडा येथील अंगणवाडी शिक्षिका चांगुना मोहनराव बालूरे हे सेवानिवृत्त झाले. ग्रामपंचायत कडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामसेवक आनंद कुठे सरपंच कृष्णा पाटील, ग्रामपंचायत सदस्य पंढरीनाथ खुळे, सुनिता बालूरे, लिपिक अनिल शेंडगे, रोजगार सेवक श्रीकांत मोघे, तुकाराम मुळखेडे,बाल विकास प्रकल्प अधिकारी उषा गुरव, आशा सूपरवायजर रेखा लांडगे, एन.एन.एम. ज्योती नारंगवाडे, अंगणवाडी शिक्षिका शांता सूर्यवंशी, शांताबाई सूर्यवंशी, मंगल साखरे, लक्ष्मी भोसले, अर्चना माळी आशा कार्यकर्ती संगिता कोयले, सावित्रा बिरादार, अंगणवाडी सेविका सूलोचना गोपाळ बालूरे, महानंदा सिरसे, पुंडलिक सूर्यवंशी राम हूरूचनाळे राहुल खुळे, गोपाळ बालूरे, गोपाळ मदने, अनिता भोसले, तानाजी बालूरे सह शिवाजीनगर तांडा येथील ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिडीत कुटुंबीयांना सहकार्याचा हात



**वाडा/प्रतिनिधी**

केंद्रीयमंत्री मंत्री कपिल पाटील यांचे स्विय सहाय्यक नंदकुमार कापसे व अबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी साठे यांनी आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या घरातील कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. आबिटघर ग्रामपंचायत हद्दीतील मौजे साठेपाडा येथे मोलमजुरी करून आपल्या कुटुंबीयांसह राहणाऱ्या वनिता रावते यांच्या घराला उन्हाच्या कडाक्यात आग लागून संसार जळून खाक झाला. सदर हातावर पोट भरणारे कुटुंब रस्त्यावर आले. या भीषण आगीची माहिती मिळताच आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी साठे यांनी तात्काळ सदर ठिकाणी भेट देऊन त्यांना आधार दिला व त्यांना कुठून मदत मिळते का याची चाचपणी केली. या दुर्दैवी घटनेची माहिती भाजपा नेते योगेश पाटील यांनी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली असता रविवारी त्यांचे स्वीय सहायक नंदकुमार कापसे यांनी आबिटघरच्या सरपंच साक्षी साठे यांच्या समवेत सदर पिडीत कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना दिलासा दिला.

# भिवंडीत निवासी इमारती मधील गोदामास लागली आग

**भिवंडी** : भिवंडीतील नविबस्ती नेहरू नगर येथील निवासी इमारतीच्या तळमजल्या वरील जीन्स बनविणाऱ्या गोदाम कारखान्यास गुरुवारी दुपारी आग लागण्याची घटण घडली आहे. या ठिकाणी धूर निघत राहिल्याने आग विझविण्यात अडचणी येत होत्या. या आगीची माहिती मिळताच भिवंडी अग्निशामक दलाच्या तीन गाड्या दाखल होत त्यांनी दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवले. ही आग नक्की कशा मुळे लागली हे अजून स्पष्ट झाले नसून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# मीरा रोड येथे 'लिव्ह इन' पार्टनरकडे ३० लाखांची खंडणी मागणाऱ्या महिलेला अटक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

'लव्ह जिहाद' आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करेन अशी धमकी देत आपल्या लिव्ह इन पार्टनरकडे ३० लाखांची खंडणी मागणार्या महिलेला नवघर पोलिसांनी अटक केली आहे. सय्यद अन्वर इसामुद्दीन हुसेन (३६) असे फिर्यादीचे नाव असून तो मीरा रोड येथील नया नगर येथील रहिवासी आहे. त्याने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार संध्या अदाटे (३३) या तरुणीसोबत तो डिसेंबर २०२३ पासून भाईंदर येथे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये एकत्र रहात होता. जानेवारीपासून संध्याने क्षुल्लक कारणावरून त्याच्याशी भांडण सुरू केले होते. त्यानंतर काही दिवसांतच तिने पैशाची मागणी करत त्रास देण्यास सुरुवात केली होती. लव्ह जिहाद, बलात्कार आणि ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत दिने ३० लाखांची खंडणी मागितल्याची तक्रार हुसेन याने केली आहे. हुसेन याचा मित्र नीलेश सोनी आणि इतरांवर सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी तिने दिल्याचा आरोपही हुसैन यांनी केला आहे. या प्रकरणी नवघर पोलिसांनी संध्या अदाटे विरोधात खंडणी, फसवणूक आदी विविध कमलांअतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे. आरोपी संध्या अदाटे हिचे यापूर्वीच लग्न झाले असून तिच्या पतीविरोधात कौटुंबिक न्यायालयात दावा प्रलंबित आहे.

पान १ वरून....

## चुगलीखोरीचा संशय खूपच बळावत...

काम करणाऱ्या दोन परप्रांतीय तरूणात किरकोळ कारणातून वाद झाला. त्यातील एका अल्पवयीन मुलाने आपल्या दुसऱ्या सहकार्याच्या डोक्यात तो झोपलेला असताना लोंखडी रॉड घालून त्याचा खून केला. ही घटना शनिवार दि.२७ एप्रिल २०२४ रोजी सकाळी उघडकीस आली. हुपरी पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली. हातकणंगले तालुक्यातील हुपरी जवळील पट्टणकोडोली येथे विकास भवान याचे साईप्रसाद ट्रेडर्स नावाच कोल्ड्रिंकची एजन्सी आहे. तेथे ते वेगवेगळया कंनपीची शीतपेय तयार करून लहान मोठया दुकानात विकत असतात. त्यासाठी त्यांनी कामगार ही ठेवले असून त्याचेकडे उत्तरप्रदेशातील पुलंदपुर महारगंज येथील सुलेमान मंतुसरीब आणि त्याचा एक अल्पवयीन मित्र असे दोघेजण कामाला आहेत. ते दोघे ही विकास भवान यांच्या गोडावूनमध्येच राहयला आहेत. दिवसभर काम करायचे आणि जेवण करून त्या गोडावूनमध्येच झोपायचे असा त्याचा नित्यक्रम आहे. २० वर्षीय सुलेमान हा कामाला अतिशय हुशार आणि चालाख असल्याने मालक विकास भवान याचा त्याचेवर विश्वास बसला होता. त्याच्याच ओळखीने विकास यांनी सुलेमान याचा मित्राला कामाला ठेवून घेतले होते. तो ही उत्तरप्रदेशातील असल्याने त्याचे आणि सुलेमानचे पटेल दोघे ही एकमेकांना समजावून घेतील असे विकास भवान यांना वाटले. दोघे ही तरूण त्यामुळे त्या दोघात कोणत्या ना कोणत्या कारणातून सारखा वाद हा होत होता.या वादात सुरूवातील मालक विकास भवान यांनी दोघाना ही समजावून सांगितले. वाद करीत बसू नका, चांगले राहावा मी तुम्हाला खायला प्यायला काही कमी करणार नाही असे सांगितले. सुलेमानच्या घरची परिस्थीती गरिबीची असल्याने तो काम चुकार पणा करीत नव्हता.तो सारखा पडेल ते काम करून मालकाची मर्जी सांभाळत होता. त्यामुळे मालक विकास भवान याचा ही त्याचेवर विश्वाद बसला होता. ते सांगतील ते काम सुलेमान करीत असल्याने तो मागेल त्यावेळी ते त्याला पैसे देत होते.मात्र याच्या उलट परिस्थीती त्याच्या मित्राची होती. तो काम करीत असताना जास्त बेफिकीर राहत होता.तो कामचुकारपणा करीत असल्याने मालक त्याला सारखे बोलत होते. त्यामुळे सुलेमान हा आपल्या विषयी मालकांना उलट सुलट सांगत असावा असे त्याला वाटत असल्याने तो सारखा सुलेमान बरोबर वाद घालून त्याच्याबरोबर भांडण काढत होता. बऱ्याचवेळेला त्या दोघांचे भांडण मालक विकास भवान यांनी सोडविले होते. तरी ही त्या दोघांचे भांडण काही मिटत नव्हते. मालक तरी काय करणार होते. ते दोघे ही एकाच राज्यातील असल्याने त्याची भाषा ही एकच होती. दोघेही भांडणात आपल्या भाषेत खालच्या पातळीत जावून एकमेकांना शिवीगाळ करीत होते. एकदा दोनदा विकास भवान यांनी त्या अल्पवयीन मुलाला कामावर येवू नकोस असे बजावून सांगितले होते. तरी ही बाहेर कुठे काम मिळत नाही शिवाय या परिसरात त्याचे कुणी ओळखीचे ही नसल्याने तो घाबरत होता.कधी कधी तो कामासाठी जुळवून ही घेत होता. पण त्याला राग लवकर येत होता. तो रागाच्या भरात कोणाला काही बोलत होता कोणाला ही मारायला जात होता.त्याच्यात चिडचिडपणा जास्त असल्याने सुलेमान हा कधी त्याच्या नादाला लागत नव्हता. कामापुरेतच तो त्याला बोलत होता.त्यामुळे त्याच्या डोक्यात एकच विषय असायचा मालक सुलेमान याला जवळ करतात आणि मला डावलतात. मी कधी त्याच्याकडे पैसे मागितले तर ते मला देत ही नाहीत. उलट सुलेमान याने पैसे मागितले तर ते त्याला लगेच काढून देतात. याचा अर्थ सुलेमान हा आपल्या विषयी मालकांना उलट सुलट सांगत असावा असे त्याला वाटत होते. त्यामुळेच सुलेमानचे आणि त्याचे कधी पटत नव्हते.मागील आठवडयात एके ठिकाणी त्या दोघात माल उतरण्यावरून वाद झाला.या वादात दोघात मारामारी ही झाली होती. त्यावेळी सुलेमान याला त्याने बघून घेण्याची भाषा केली. शुक्रवार दि.२६ एप्रिल रोजी त्या दोघांत किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद मालकापर्यत नेहमीप्रमाणे गेला. त्यावेळी मालकांनी सुलेमानची बाजू घेत त्याला खडसावले. तुला काम करायचे असेल तर कर नाही तर तु सरळ काम करू नकोस तु दुसरीकडे काम बघ. मालकांनी असे सांगितल्यांने तो सुलेमानवर भयंकर चिडला. ते दोघे ही रात्री जेवण करून दारू पिऊन गोडावून मध्ये झोपले. सुलेमान याला झोप लागली. पण त्याच्या मित्राला झोप काही लागत नव्हती. तो सारखा मनातून चरफडत होता. पहाटेच्या सुमारास झोपलेल्या सुलेमानकडे बघून त्याचा राग अनावर झाला. त्याने बाजुलाच पडलेला लोंखडी रॉड घेतला आणि सरळ सुलेमानच्या डोक्यात दोन तीन वेळा जोरात हाणला. डोक्यावर वार झाल्याने झोपेत असलेल्या सुलेमान याला ओरडण्याची संधी ही मिळाली नाही. त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात येताच त्याने सरळ गोडावून उघडून पहाटे पहाटेच तेथून पळ काढला. जाताना त्याने गोडावूनला बाहेरून कडी लावली आणि तो मिळेल त्या गाडीने पळून गेला. सकाळी सकाळी नेहमीप्रमाणे मालक विकास भवान हे गोडावून कडे आले असता त्यांना गोडावूनला बाहेरून कडी लावल्याचे दिसून आले. त्यांनी सुलेमानला आणि त्याच्या मित्राला हाका मारत कडी काढली.कडी लावून ते दोघे कुठे तरी बाहेर गेले असावेत असे त्याना वाटले. तरी ही हे हाका मारत गोडावूनमध्ये आले. सुलेमान झोपत असलेल्या ठिकाणाजवळ गेले असता त्यांना सुलेमानच्या अंगावर रक्ताने माखलेली चादर दिसली. त्याचे काळीजच चिर्र झाले. तर बाजुलाच रक्ताने माखलेला लोंखडी रॉड पडलेला दिसला. त्यांनी झटकन त्याच्या जवळ जात त्याची चादर बाजुला केली.तर त्याचे डोके फुटलेले दिसले. त्याचा जागीच मृत्यू झाला होता. हा खूनाचा प्रकार आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्यांनी सुलेमानचा मित्राला हाका मारल्या परंतु तो तेथे त्यांना दिसून येत नव्हता.याचा अर्थ काल झालेल्या भांडणातून सुलेमान याचा त्याच्या मित्रांनेच खून केला असावा अशी शंका त्यांना आली. त्यांनी तातडीने या घटनेची माहिती हुपरी पोलीसांना दिली. सकाळ सकाळी खूनाची बातमी मिळाल्याने हुपरी पोलीसांनी पट्टणकोडोली येथे घटनास्थळ गाठून या घटनेची माहिती विकास भवान याच्याकडून घेऊन तपासाला सुरूवात केली. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथकाला तसेच ठसे तज्ञांना ही बोलावून घेतले.घटनेचा पंचनामा करून मृतदेह पोस्ट मार्टमसाठी पट्टण कोडोली येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिला.हा खून कुणी आणि कोणत्या कारणासाठी केला याची माहिती पोलीसांना मिळाल्याने या घटनेतील संशयीत आरोपी हा उत्तरप्रदेशातील आपल्या गावी पळून जाण्याची शक्यता असल्याने पोलीसांनी विकास भवान याच्याकडून त्याचा मोबाईल नंबर घेऊन त्याचे कॉल लोकेशन काढले असता त्याचे मोबाईल लोकेशन हे कोल्हापूर येथील रेल्वे स्टेशन दाखवित होते. त्यातच त्याने उत्तरप्रदेशातील आपल्या भावाला पैशासाठी फोन ही केल्याचे त्याच्या मोबाईल कॉल रेकॉर्डींग वरून पोलीसांना समजले. तातडीने हालचाल करीत हुपरी पोलीसांनी एक पथक तयार करून कोल्हापूर येथील रेल्वे स्टेशन गाठले असता पळून जाण्याच्या तयारीत असणाऱ्या संशयीत आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याला हुपरी पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या गुन्हयाची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देवू लागला. त्याला पोलीसी दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद विकास भवान यांनी हुपरी पोलीसात दिल्याने त्याच्या फिर्यादीनुसार सुलेमान मुंतसरीब (वय २०) याच्या खून प्रकरणी त्याचा अल्पवयीन मित्र (वय १७) रा.दोघे ही उत्तरप्रदेश सध्या रा.पट्टण कोडोली याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला इचलकरंजी येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बालसुधारग्रहात केली. या गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक निंगाप्पा चौंखडे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक प्रसाद कोळपे, कॉ.प्रभाकर कांबळे, संदेश शेटे, अल्पेश पोटकुळे, विठ्ठल कोले यांनी केला.

## संशयामुळे संसाराची शोकांतिका...

असत, पण हे वाद आता मारहाण करण्यापर्यंत येऊन पोहोचले होते. अर्जुन हा वैशालीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला मारहाणही करत असे. दि. १६ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता वैशाली व अर्जुन असे दोघे जण तिच्या वडीलांच्या घरी जावून येतो असे भाऊ सोमनाथला सांगून घरातून बाहेर पडले. रात्री ते सोमनाथच्या घरी जेवणासाठी परत येणार होते. रात्री आठ वाजता सोमनाथने वैशालीला फोन केला. तुम्ही जेवायला कधी येता? अशी विचारणा त्याने केली, तेंव्हा तिने आम्ही लगेच येतो असे त्यास सांगितले. इकडे सोमनाथ हाआपल्या बहिणीची आणि भाऊजीची वाट पहात जेवायचा थांबला होता. खूप वेळ निघून गेला तरी ते दोघे आले नाहीत, त्यावेळी सोमनाथ आणि त्याच्या घरच्या लोकांनी विचार केला की ते दोघे वडीलांच्या घरी जेवत असतील, आपणही जेवून घेवूया असे म्हणत त्या सर्वांनी जेवण केले आणि ते झोपी गेले. दुसरा दिवस उजाडला. वैशाली आणि अर्जुन हे दोघे आले नव्हते म्हणून सोमनाथ हा आपल्या वडीलांच्या घरी गेला. त्याठिकाणी वैशाली आणि अर्जुन हे दोघे दिसतील असे त्याला वाटले, पण घरात ते दोघे दिसले नाहीत म्हणून त्याने वडीलांना विचारले, 'वैशाली आणि अर्जुन कुठे आहेत?' तेंव्हा सोमनाथचे वडील म्हणाले, 'अरे ते दोघे रात्रीच निघून गेले.' 'बाबा... खरं सांगता ना... रात्री ते घराकडे आलेच नाहीत, म्हणून मी इकडे आलोय... व्हय रे बाबा... रात्रीच गेलेत ते... सोमनाथच्या वडीलांनी असे म्हटल्यावर सोमनाथला आश्चर्य वाटले. 'गेले हे कुणीकडं' असं मनातल्या मनात म्हणत तो तेथेच थांबला. 'काय हो बाबा कुठं गेले असतील ही दोघं... माझ्याकडं तर ती आली नाहीत. मी वैशालीला आठ वाजता फोन केला होता... असे तो आपल्या वडीलांना म्हणाला. सोमनाथच्या वडीलांनाही आपल्या मुलीबद्दल आणि जावयाबद्दल काळजी वाटू लागली, ते दोघे नेहमी भांडत असतात. अर्जुन हा वैशालीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिच्याशी वाद घालत असतो... असे विविध विचार त्यांच्या डोक्यात घोळू लागले. मुलीचं आणि जावयाचं नेहमी भांडण होत असतं हे माहित असल्यामुळे त्या दोघांनी आजूबाजूला व परिसरात त्यांचा शोध घ्यायला सुरूवात केली, पण ते दोघेही मिळून आले नाहीत. अखेरीस सोमनाथने वैशालीच्या फोनवर कॉल लावला असता तो लागला नाही. हे सारे शंकास्पद होते, म्हणून सोमनाथ हा गावात जावून त्यांचा शोध घेवू लागला. ते दोघेही कुठेच सापडत नव्हते. सकाळचे ९ वाजले असावेत. सोमनाथ हा बहीण आणि भाऊजीचा शोध घेत आहेत हे गावातल्या काही लोकांना समजले होते. त्यावेळी जसू सिताराम चौधरी याने सोमनाथला फोन करून सांगितले की तुझी बहीण वैशाली अर्जुन पवार ही तुळशीराम चंबार वाघमारे यांच्या फॉरेस्ट प्लॉटमध्ये मृतावस्थेत पडली आहे. वाघमारे यांचा प्लॉट न. २२ हा देशमुखनगर याठिकाणी आहे, तसेच तिच्या पतीने अर्जुन शामल पवार याने साधारण ५० फूट अंतरावर असणाऱ्या सादड्याच्या झाडाला गळफास घेतला आहे. माहिती मिळताच सोमनाथ हा धावतच घटनास्थळी गेला. त्याठिकाणी वैशाली मृतावस्थेत जमिनीवर पडली होती, तर अर्जुन याने सादड्याच्या झाडाच्या फांदीला गळफास घेतला होता. सोमनाथने आपल्या वडीलांना फोन लावून ही बाब कळवली. तसेच सरपंच मज्जीत जयराम चौधरी व सावळीराम पांडू महाले यांनाही घटनास्थळी बोलावून घेतले. सोमनाथ व इतरांनी वैशालीजवळ जावून पाहिले असता तिच्या गळ्यावर काळे व्रण दिसत होते. त्यावरून सर्वांना संशय आला की वैशालीचा खून तिचा पती अर्जुन यानेच केला आहे आणि त्यानंतर त्याने गळफास लावून घेतला आहे. अर्जुन हा नेहमी वैशालीवर संशय घेत असल्याने त्यातूनच त्यानेहे कृत्य केले आहे याची खात्री सोमनाथ आणि त्याच्या वडीलांची झाली. अर्जुन याने वैशालीचा गळा दाबून ती मरण पावल्यावर तिची ओढणी आणि दोरी घेवून ५० फूट अंतरावर असणाऱ्या सादड्याच्या झाडाला गळफास लावून घेतला होता. या घटनेची माहिती सुरगाणा पोलीस ठाण्यात देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ व दोन्ही व मृतदेहांचा पंचनामा केला. सोमनाथ तुळशीराम कोदे याने दिलेल्या फिर्यादीवरून वैशालीचा पती अर्जुन शामल पवार याच्या विरोधात सुरगाणा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. १०६/२०२४ भा.दं. वि. ३०२ कलम खाली गुन्हा दाखल करण्यात आला. अर्जुन याने गळफास घेवून आत्महत्या केल्याने त्याची अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी स्वतः या गुन्ह्याचा तपास आपल्या हाती घेतला. रात्री वडीलांच्या घरातून बाहेर - पडल्यावर रस्त्याने जातांना अर्जुन याने वैशालीच्या चारित्र्यावर संशय घेवून वाद घालायला सुरूवात केली. दोघांचे कडाक्याचे भांडण झाले. यामध्ये अर्जुन हा संतापला आणि त्याने रस्त्यातच वैशालीचा गळा पकडला. आजूबाजूला कोणी नसल्याने त्यांना अडवायला कोणी नव्हते. त्याच्या हाताची पकड इतकी घट्ट होती की थोड्याच वेळात वैशाली मरण पावली. ती निपचित झाल्याचे लक्षात येताच अर्जुन याने तिच्या गळ्यावरचा हात काढला आणि वैशाली खाली कोसळली. आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच त्याने वनपट्ट्यातील एका सादड्याच्या झाडाला ओढणी व दोरीने गळफास घेत आत्महत्या केली. मृतदेहाचे विच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. त्या दोघांवर गुजरातमधील बिशोनीया गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. चारित्र्याचा संशय घेवून अर्जुन पवार याने पत्नी वैशालीचा गळा दाबून खून केला आणि आपण स्वतः आत्महत्या केल्याने त्यांचा सहा वर्षाचा मुलगा अनाथ झाला आहे. यावेळी अर्जुन याने आपल्या लहान मुलाचा विचार केला नाही.सदर घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संजय गायकवाड व उपनिरीक्षक सुजित पाटील करत आहेत.

पान ८ वरून....

## ६५ घरफोड्या करणारा सराईत ...

माहिती पोलीस उपायुक्त (परिमंडळ २) पूर्णिमी चौगुले यांनी सांगितले. यापुर्वी देखील त्याला अटक करण्यात आली होती. मात्र जामिनावर सुटल्यानंतर तो पुन्हा चोऱ्या करायचा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने, पोलीस निरीक्षक संतोष चौधरी (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सनिल पाटील, शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौदरी, गोविंद लवटे आदींच्या पथकाने या अवलिया चोराला पकडण्यात यश मिळवले.

13 TO 19 MAY 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2024 8:47 PM Page 1



# मध्यप्रदेशातून अपहरण केलेल्या सहा महिन्याच्या बाळाची पनवेलमधून सुटका



**कल्याण/प्रतिनिधी**

मध्यप्रदेशातील रिवा जिल्ह्यातील सिव्हिल लाईन हद्दीतून सोमवारी एका सहा महिन्याच्या बाळाचे पदपथावरून अपहरण झाले होते. या बाळाला सहा जणांनी कल्याण मधील शहाड येथे पळून नेले असल्याची माहिती मिळविल्यावर मध्यप्रदेश पोलीस आणि कल्याणच्या पोलिसांनी संयुक्त कारवाई करून शहाड येथून अपहरणकर्ते आरोपींना अटक केली. या आरोपींच्या माध्यमातून पनवेल येथून अपहृत बालकाची एका इसमाच्या ताब्यातून सुटका करून त्याचा ताबा घेतला. याप्रकरणात एक शिक्षक, त्याची पत्नी आणि एक माजी विद्यार्थी आणि दोन संशयित महिलांना पोलिसांनी अटक केली आहे, अशी माहिती कल्याणचे पोलीस उपायुक्त सचीन गुंजाळ यांनी दिली. या बाळाची २३ लाखाला विक्री केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मध्य प्रदेशातील रिवा जिल्ह्यातील सिव्हील लाईन भागात एक फिरस्ते दाम्पत्य आपल्या सहा महिन्याच्या बाळासह पदपथावर रात्रीच्या वेळेत झोपले होते. सकाळी उठल्यानंतर या दाम्पत्याला आपल्या बाळ जागेवर नसल्याचे दिसले. त्याचा शोध घेण्यात आला. पण ते कोठेच आढळले नाही. सिव्हील लाईन भागातील पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. मध्यप्रदेश पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे या प्रकरणाचा शोध सुरू केला. त्यावेळी बाळाला कल्याण मधील शहाड भागात राहत असलेल्या एका टोळक्याने पळून नेले असल्याचे पोलिसांना समजले. कल्याण आणि मध्यप्रदेश पोलिसांनी शहाड येथील संबंधित ठिकाण शोधून काढले. तेथून अपहरण करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली. अपहृत सहा महिन्याचे बाळ पनवेल मधील सिडको सेक्टर १४ येथे एका इसमा सोबत असल्याची माहिती आरोपींकडून पोलिसांना मिळाली. पोलिसांनी पनवेलला जाऊन पहिले बाळाचा ताबा घेऊन बाळाचा ताबा असलेल्या संशयित इसमाला ताब्यात घेतले. आठ तासात पोलिसांनी हा संवेदनशील गुन्हा उघडकीला आणला. याप्रकरणात पोलिसांनी एक शिक्षक, त्याची पत्नी, त्यांचा माजी विद्यार्थी, दोन संशयित महिलांना अटक केली आहे. आरोपींसह बाळाला मध्यप्रदेश पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे, असे उपायुक्त गुंजाळ यांनी सांगितले.

या बाळाचे अपहरण करण्यामागील आरोपींचा उद्देश काय होता, त्याची कोठे विक्री केली होती. याचा तपास मध्यप्रदेश पोलिसांनी सुरू केला आहे. याप्रकरणात खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक शिवले, साहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल गायकवाड, हवालदार राजू लोखंडे, सुधील पाटील अशा दोन पथकांनी ही अटकेची कारवाई केली.

# ठाणे आयुक्तालय क्षेत्रात 3 हजार ७४८ परवानाधारक अग्निशस्त्र जप्त

**ठाणे/प्रतिनिधी**

निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने ठाणे पोलिसांनी परवानाधारक अग्निशस्त्र जप्त करण्यास सुरुवात केली आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात ४ हजार ४५७ परवानाधारक अग्निशस्त्र आहेत. त्यापैकी ३ हजार ७४८ अग्निशस्त्र पोलिसांनी जप्त केले आहेत. काही महिन्यांपूर्वी आमदार गणपत गायकवाड यांच्याकडून शिंदे गटाचे पदाधिकारी महेश गायकवाड यांच्यावर परवानाधारक अग्निशस्त्राने गोळीबार झाला होता. त्यानंतर पोलिसांनी परवानाधारक अग्निशस्त्राविषयी सावधगिरीची पावले उचलली आहेत. ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदारसंघ येतो.

या मतदारसंघातील बहुतांश भाग ठाणे शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतो. ठाणे शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहराचा भाग येतो. तर या लोकसभा मतदारसंघांचा उर्वरित भाग ठाणे ग्रामीण, मिरा भाईंदर आणि नवी मुंबई क्षेत्रात येतो. निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत शस्त्र परवानाधारकांनी शस्त्रे पोलीस ठाण्यात जमा करणे बंधनकारक असते. निवडणुकीच्या वेळी अग्निशस्त्रांचा वापर करता येत नाही. अग्निशस्त्र वापरणाऱ्यांकडून मतदारांवर प्रभाव पाडणे, धमकावणे किंवा मतदारांना एखाद्या विशिष्ट पक्षाला मतदान करण्यास भाग पाडण्यासाठी याचा वापर केला जाऊ शकतो.

त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तसेच निवडणुका निष्पक्ष पार पाडल्या जाव्यात म्हणून पोलिसांकडून ही अग्निशस्त्रे जप्त केली जातात. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात एकूण ४ हजार ४५७ परवानाधारक अग्निशस्त्र आहेत. त्यापैकी ३ हजार ७४८ अग्निशस्त्र जप्त करण्यात आली आहेत. असे असले तरी सुरक्षेच्या कारणास्तव काही जणांना त्यातून वगळण्यात आले आहे. तर काहींना सुरक्षेच्या कारणास्तव शस्त्र बाळगण्याची सक्ती आहे. बँक सुरक्षा रक्षक आणि सुरक्षा संस्थांचे सशस्त्र कर्मचारी, कर्तव्यावर असलेले सरकारी कर्मचारी आणि अंगरक्षक यांच्या सक्तीमुळे शस्त्रे ठेवण्यास सूट देण्यात येते. उल्हासनगर येथील हिललाईन पोलीस ठाण्यात भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी त्यांच्या बंदुकीने शिंदे गटाचे महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता.

# रानगाव येथील रॉयल रिसॉर्टमधील तरणतलावात बुडून चिमुकलीचा मृत्यू



**वसई/प्रतिनिधी**

वसईच्या रानगाव येथील रॉयल रिसॉर्टमध्ये असलेल्या तरणतलावात बुडून दहा वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. रिद्धी माने असे या दुर्घटनेत मरण पावलेल्या मुलीचे नाव आहे. वसई विरारच्या समुद्र किनाऱ्यावर अनेक रिसॉर्ट आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टी लागल्याने या रिसॉर्ट मध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. बुधवारी सकळी विरारच्या कारगिल नगर येथे राहणारी एक महिला आपल्या मुलीसह रानगावच्या रॉयल रिसॉर्टमध्ये आली होती. रिद्धी ही तरणतलावात आईसह उतरली होती. काही वेळाने तिथे आई रिसॉर्टच्या खोलीमध्ये गेली होती. तेव्हा रिद्धीच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी आम्ही अपमृत्यूची नोंद केली आहे. तपास चालू असून त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल अशी माहिती वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत आंधळे यांनी दिली. या रिसॉर्टमध्ये जीवरक्षक नसल्याचेही उघड झाले आहे. वसई विरारच्या रिसॉर्ट मधील जलतरण तलावात यापूर्वी देखील अनेक पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला आहे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कुठलेही प्रकारच्या उपाययोजना केल्या जात नसल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# विविध वृक्षांची बीज तुला करून चिमूकलीचा केला वाढदिवस साजरा



**लातूर/प्रतिनिधी**

येथील ग्रीन लातूर वृक्ष टीमने बहावा, चिंच, कडुलिंब, रतन गुंजा, खैर, आवळा, हिरडा, बेहडा, अर्जुन, करंज, आपटा, शमी, बेल, शेवगा अशा देशी व उपयुक्त वृक्षांच्या बिया संकलित करून एक अभिनव उपक्रम राबवित कु. श्रीजा चा दुसरा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजर केला. यावेळी श्रीजाचे आई अश्र्विनी नवटक्के वडील मनोज नवटक्के, आजी सुनीता केशव नवटक्के, मामा राजेश सावंत-मामी अनिता सावंत, आजी जयश्री सावंत, आजोबा परमेश्वर सावंत, मामा आकाश सावंत, विकास सावंत, भाऊ कृष्णा नवटक्के, दाजी-शिवम सावंत, वेदांत सावंत तसेच ग्रीन लातूर वृक्ष टीमचे सदस्य आदि मान्यवर उपस्थित होते. श्रीजा चा मामा ग्रीन लातूर वृक्ष टीम सोबत जुडलेला आहे. प्रत्येक सण उत्सव जयंती वाढदिवस निसर्ग पर्यावरणा सोबत साजरी करण्याचं ग्रीन लातूर वृक्ष टीमच नेहमीच ध्येय धोरण आहे. श्रीजा च्या मामाने म्हणजे आकाश सावंत ने यावेळेस श्रीजाचा वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचं ठरवलं. त्याकरिता खूप वेळा चर्चा झाली, नेहमीच्या पद्धतीने हॉटेलमध्ये पार्टी वगैरे न करता श्रीजाची बियांची तुला करून त्याचे बीज गोळे बनवण्याचे ठरवले. ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सर्व सदस्यांनी समारंभाची आखणी केली. विविध ठिकाणाहून बहावा, चिंच, कडुलिंब, रतन गुंजा, खैर, आवळा, हिरडा, बेहडा, अर्जुन, करंज, आपटा, शमी, बेल, शेवगा अशा देशी व उपयुक्त, आपल्या भागात येणाऱ्या बिया संकलित करण्यात आल्या. सोहळ्याचा दिवस उजाडला. सर्वजण आले होते. सकाळी ६ वाजता बीज तुला सोहळ्याची तयारी सुरू करण्यात आली. मोठ्या पिंपळाच्या झाडाखाली छान असा लाल गालिचा अंथरण्यात आला, मोठा तराजू फुलांनी सजवला होता. रंगबिरंगी फुगे लावण्यात आली. कु. श्रीजाने छानसा सुंदर आकर्षक ड्रेस घातला होता. श्रीजाला पाटावर बसवले. मावशी आत्या आणि आजीने श्रीजाला दिव्यांनी ओवाळले. औक्षण केले, गळ्यात फुलांचा हार घातला आणि तिला तराजूच्या एका पारडय़ात बसवले. आणि एकेक बियांची पिशवी दुसऱ्या पारडय़ात ठेवल्या. प्रत्येकाने एकेक बियांची पिशवी ठेवीत गेल्यावर श्रीजा च्या वजनाईतका काटा १२ किलोवर आल्यावर सर्वांनी टाळ्यांच्या गजरात वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आनंद उत्साहाने जल्लोष केला. आपल्या बाळाबरोबर हया बियाव्दारे तयार होणारे झाड शतायुषी होवो अशा सर्वांनी शूभेच्छा दिल्या. या बीज तुला नंतर या देशी दुर्मिळ बियांचे माती, शेणखत, कोळसा पावडर यांच्या मिश्रणाद्वारे बीज गोळे बनवण्यात आले. हे बिजगोळे पहिल्या पावसानंतर हत्तीबेट परिसरात रोपण करण्याचं नियोजन करण्यात आलं. या पद्धतीने ग्रीन लातुर वृक्ष टीमने आज त्याच्या घनदाट झाडांच्या प्रकल्पात झाडांना दोन टँकर द्वारे भरपूर पाणी देऊन बीज तुला व बीज गोळे बनवण्याचा अनोखा अद्वितीय असा उपक्रम पूर्ण केला.आणि समाजातील सर्व नागरिकांना प्रत्येक सण उत्सव जयंती वाढदिवस प्रत्येक कार्यक्रम निसर्ग पर्यावरण झाडे यांना सोबत घेऊन साजरा करण्याचा संदेश दिला.ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सर्व सदस्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्याकरिता मागील आठ दिवसापासून प्रचंड मेहनत घेतली.या पद्धतीने ग्रीन लातूर वृक्ष टीमने आज आपल्या कार्याचा अखंड अविरत सातत्याचा १८०४ वा दिवस पूर्ण केला.

# वाडा येथे मेळावा संपन्न

वाडा : विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक आवड निर्माण व्हावी, प्रवेश प्रक्रियेमध्ये वाढ व्हावी व विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने शिक्षण विभागाने शाळा पूर्वतयारी साठी शनिवारी वाडा शहरातील जिल्हापरिषद शाळा येथे पूर्व तयारी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याचे पुष्पवर्षावात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनात्मक, भाषा विकास व गणनपूर्व तयारी करून घेण्यात आली. सदर मेळाव्या प्रसंगी रिद्वान कोतकर, नरेश आकरे, शालखा अंबावणे, जागृती पवार, निर्जा थालेकर आदी पालक उपस्थित होते. मुख्याध्याप सुनिल मोरे यांच्यासह उमेश चौगले, हर्षाला पाटील, अस्मिता ठाकरे, विजया बाराथे यांच्यासह इतर शिक्षकांनी मुलांचे स्वागत केले.

# कोकण रेल्वेची गणेशोत्सव प्रतीक्षा यादी ५०० पार; एका मिनिटात गाड्या संपूर्ण आरक्षित

**मुंबई/प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्यांचे आरक्षण सुरू झाले असून कोकणवासीयांची आरक्षित तिकिटे काढण्यासाठी धडपड सुरू आहे. मात्र, कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्यांचे आरक्षण सुरू झाल्यानंतर काही मिनिटांत प्रतीक्षा यादीचे फलक लागून, प्रतीक्षा यादीची मर्यादाही संपल्याचे संदेश नागरिकांना येऊ लागले आहेत. कोकणकन्या एक्स्प्रेसचे आरक्षण मंगळवारी सुरू झाल्यानंतर अवघ्या एका मिनिटांतच प्रतीक्षा यादी ५०० पार गेली. त्यामुळे यात तिकीट आरक्षणात गैरप्रकार होत असल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात आहे. यंदा ७ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थी असून मुंबई महानगरातील कोकणवासीय कोकणातील मूळ गावी जाण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार गणेश चतुर्थीच्या एक आठवडा आधीच कोकणात जाण्याचे नियोजन केले आहे. भारतीय रेल्वेवरील नियमित रेल्वेगाड्यांचे तिकीट आरक्षण रेल्वे सुटण्याच्या १२० दिवसापासून सुरु होते. त्यामुळे १ सप्टेंबर रोजी मुंबईतून कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाडीचे तिकिटे ४ मेपासून काढण्यास सुरुवात झाली. गणेश चतुर्थीच्या तीन दिवस आधी म्हणजे ४ सप्टेंबर रोजीचे तिकीट काढण्यासाठी कोकणवासीयांची प्रचंड लगबग सुरू होती. त्यासाठी तिकीट केंद्रावर आदल्या रात्रीपासून रांगा लावण्यात येत आहेत. त्यानंतर ४ सप्टेंबरचे आरक्षण ७ मे रोजी सकाळी ८ वाजता सुरू झाल्यानंतर १ मिनिट ३ सेकंदात कोकणकन्याची प्रतीक्षा यादी ५८० च्या पुढे गेली. त्यानंतरची इतर कोकणात जाणाऱ्या एक्स्प्रेसची तिकिटे काढण्यास गेल्यास 'रीग्रेट' दाखवण्यात येत आहे.

जनशताब्दी एक्स्प्रेसच्या द्वितीय आसन श्रेणीची प्रतीक्षा यादी ४ सप्टेंबर रोजी 'रिग्रेट' दाखविण्यात येत होती. तसेच कोचुवेली एक्स्प्रेसचे शयनयान, द्वितीय श्रेणी वातानुकूलित, तृतीय श्रेणी वातानुकूलित असे सर्व डब्याची प्रतीक्षा यादी 'रिग्रेट' होती. यासह मंगला लक्षद्वीप एक्स्प्रेस आणि नेत्रावती एक्स्प्रेसचे शयनयान, द्वितीय श्रेणी वातानुकूलित, तृतीय श्रेणी वातानुकूलित, वातानुकूलित ३ इकॉनॉमी डबा 'रीग्रेट' मध्ये होता. श्री गंगानगर-कोचुवेली एक्स्प्रेस, तुतारी एक्स्प्रेस, मांडवी एक्स्प्रेसचे शयनयान डबे 'रिग्रेट' होते. तर, वंदे भारतच्या वातानुकूलित चेअर कार डब्याची प्रतीक्षा यादी १६८ होती. गेल्यावर्षी गणेशोत्सवाची तिकिटे काढताना कोकणकन्या एक्स्प्रेसची प्रतीक्षा यादी अवघ्या दीड मिनिटांतच एक हजारांपार गेली होती. त्यानंतर त्यात तिकीट आरक्षणात गैरप्रकार झाल्याची शंका प्रवाशांकडून व्यक्त केली होती. तपासअंती यात अनेक तिकीट आरक्षण खाती बनावट असल्याचे उघड झाले होते. मुंबईतून रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या मार्गावर जाणाऱ्या रेल्वेगाड्यांचे आरक्षण ७ मे रोजीपासून सुरू झाले. ७ मे रोजी सकाळी ८ वाजल्यापासून पुढील १२० दिवसांचे म्हणजे ४ सप्टेंबरपर्यंतचे तिकीट काढता येणे शक्य आहे. मात्र, सकाळी ८ वाजता तिकीट काढण्यास सुरुवात केली असता काही मिनिटांतच कोकणात जाणाऱ्या महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादीची क्षमता संपली. त्यामुळे प्रत्येक रेल्वेगाडीची प्रतीक्षा यादी 'रीग्रेट' दाखविण्यात येत होती.

# जादूटोण्याच्या नावाखाली ढोंगी बाबाचा महिलेवर बलात्कार



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

जादू टोण्याच्या नावाखाली एका महिलेवर बलात्कार करून तिची अश्लील छायाचित्रे काढणाऱ्या विनोद पंडित नावाच्या ढोंगी बाबाला नया नगर पोलिसांनी अटक केली आहे. हस्तरेखातज्ञ असल्याचा दावा करणाऱ्या या ढोंगी बाबा पंडितने अनेक महिलांना आपले शिकार बनवले असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. फेसबुकवर जाहिरात करून तो महिलांना आपल्या जाळ्यामध्ये ओढत असे. संतोष पोतदार उर्फ विनोद पंडित (५५) नावाच्या या ढोंगी बाबाने फेसबुक वर हस्तरेखा तज्ञ विनोद पंडित या नावाने पेज सुरू केले होते. मीरा रोडच्या शांती नगर येथील मोहिनी अपार्टमेंटमध्ये त्याने आपले दुकान थाटले होते. काळी विद्या, जादूटोणा अवगत असल्याचा दावा त्याने केला होता. वैवाहिक अडचणी आणि विविध समस्या असल्यास पत्रिकेतील दोष दूर करून दिला जाईल असे या फेसबुक पेजवर त्याने म्हटले होते. जोगेश्वरीत राहणाऱ्या एका महिलेला नोकरी लागत नव्हती. ती या बाबाची फेसबुक जाहिरात वाचून त्याच्याकडे गेली होती. बाबाने तिचा विश्वास संपादन केला आणि जादूटोणा तंत्र विधीच्या नावाखाली तिच्याशी बळजबरीने शरीरसंबंध बनवू लागला. नंतर या महिलेचे लग्न झाले. परंतु एका वर्षातच तिच्या लग्नातील वैवाहिक अडचणी आल्याने पुन्हा या बाबाची भेट घेतली. मात्र या बाबाने जादूटोणाच्या नावाखाली तिच्यावर नैसर्गिक तसेच अनैसर्गिक बलात्कार केला. या काळात बाबाने तिची अश्लील छायाचित्रे काढली होती. या छायाचित्रांच्या आधारे तिला ब्लॅकमेल करून तो तिच्यावर बलात्कार करत होता. तीन वर्ष बाबा तिला धमकावून बलात्कार करत होता. अखेर कंटाळून महिलेने नया नगर पोलीस ठाणे गाठले पोलिसांनी त्याच्यावर भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ३७६ (२) (एन), ३७७, ५०६ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियमच्या कलम ६७ (बी) तसेच महाराष्ट्र नरबळी आणी इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा उच्चाटन अधिनियम २०१३ अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या ढोंगी बाबाला गुरुवार दुपारी न्यायालयात हजर केले जाणार आहे. आरोपी पंडितच्या मोबाईल मध्ये आम्हाला तीन महिलांची अश्लील छायाचित्रे आढळली आहेत. त्याने अनेक महिलांना आपले शिकार बनवण्याची शक्यता नया नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अब्दुल हक देसाई यांनी व्यक्त केली आहे. ज्या महिलांची ढोंगी बाबा पंडित याने फसवणूक केली असेल त्याने नया नगर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन नया नगर पोलिसांनी केले आहे. विशेष म्हणजे विनोद पंडित या ढोंगी बाबा वर २०१९ मध्ये देखील नया नगर पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# मतदान यंत्र सुरक्षा कक्ष परिसराची लातूर जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी



**लातूर/प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. त्यानंतर लातूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत सर्व मतदान केंद्रांवरील मतदान यंत्रे लातूर शहरातील बार्शी रोडवरील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन येथील सुरक्षा कक्षात ठेवण्यात आली आहेत. येथील सुरक्षा व्यवस्थेची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आढावा घेतला. मतदान यंत्रे ठेवण्यात आलेल्या सुरक्षा कक्षाच्या परिसरात केंद्रीय राखीव पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलामार्फत त्रिस्तरीय बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सुरक्षा कक्ष असलेल्या इमारतीच्या परिसरातील बंदोबस्ताची पाहणी केली. तसेच अनुषंगिक सूचना दिल्या. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना सुरक्षा कक्षाचे थेट चित्रण पाहण्यासाठी स्वतंत्र कक्ष याठिकाणी तयार करण्यात आला असून या कक्षालाही जिल्हाधिकारी यांनी भेट दिली.

# कै.रसिका महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

सामाजिक समतेचे व स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते, मानवतावादी समाज सुधारक महात्मा बसवेश्वर यांची जयंती कै.रसिका महाविद्यालय देवणी येथे उत्साहात साजरी करण्यात आली. प्रा अंकुश भुसावळे यांच्या शुभहस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# युवतीच्या आत्महत्येप्रकरणी ४ महिन्यांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**कल्याण/प्रतिनिधी**

कोपरखैरणेत एका युवतीने आत्महत्या केल्याची घटना डिसेंबर महिन्यात घडली होती. मात्र तिच्या परिचित युवकाने दिलेल्या मानसिक त्रासामुळे तिने आत्महत्या केली असा दावा तिच्या पालकांनी केला होता. याबाबत काही ठोस पुरावे सादर करूनही त्या युवकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला जात नव्हता. अखेर आयुक्तांपर्यंत प्रकरण गेल्यावर मात्र आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोन युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यश जाधव आणि हर्ष जाधव अशी यातील आरोपींची नावे आहेत. कोपरखैरणे येथे राहणाऱ्या एका १८ वर्षीय युवतीला आत्महत्या करण्यास भाग पाडले म्हणून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित युवती ज्या इमारतीत राहत होती त्याच इमारतीत आरोपींचे मामा राजू धनावडे राहत होते. तर आरोपी उल्हासनगर येथे राहणारे असून धनावडे यांच्याकडे दोन्ही आरोपींचे नेहमी येणे-जाणे होते. त्यामुळे आरोपींची जुजबी ओळख पीडितेशी झाली होती. त्यातून आरोपी यश याचे युवतीवर एकतर्फी प्रेम होते. मात्र युवती शिक्षणाला महत्त्व देत शिकत होती. दरम्यान त्या युवकाने तिला मानसिक त्रास देणे सुरू केले. त्यात इन्स्टाग्रामवर शारीरिक सुखाची मागणी यश जाधव याने केली.

या मानसिक धक्क्यातून ती सावरत नाही तोच तिच्या घराजवळ राहणाऱ्या हर्ष जाधव याने तिच्याशी भांडण उकरून काढले. या सर्व प्रकरणाने वैतागून सदर युवतीने १ डिसेंबरला रात्री राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. पीडित युवतीने आरोपींच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली असे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी दिली.

13 TO 19 MAY 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 5/11/2024 8:47 PM Page 1








# उदगीरमध्ये घाणीचे साम्राज्य, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**देवणी/शकील मनियार**

उदगीर नगर परिषद म्हणजे मराठवाड्यातील नंबर एक ची नगर परिषद मानली जाते कारण येथे मोठी बाजारपेठ आहे. येथील बैल बाजार, आडत व्यापार, कापड व्यापार, भाजीपाला व्यापार असे बरेचसे मोठ मोठे व्यापार उद्योगात उदगीर हे प्रसिद्ध बाजारपेठ आहे येथे इतर राज्यातील व्यापारी व शेतकरी आपला माल घेऊन व्यापारासाठी येतात मोठी उलाढाल असलेल्या बाजारपेठांमध्ये उदगीर हे नाव आघाडीवर आहे. परंतु येथील नगरपरिषद मात्र स्वच्छता अभियान ला काळे फासून सर्व शहरात विविध ठिकाणी कचऱ्याचे व घाणीचे ढीग साचले आहेत स्वतःच्या नगरपरिषद इमारती मध्ये सुद्धा मुतारी व शौचालय अतिशय घाण आहे त्यात थोड सुद्धा स्वच्छता नाही त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे स्त्रियांना फार त्रास होतो आहे. आणि न.प.इमारती च्या मागील बाजूस घाण पाणी साचून बसले आहे त्यामुळे विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आणि तसेच समता नगर मधुन डॅम रोड बोंद्रे निवास ते टीपू सुल्तान चौक हा जाणारा रस्ता अगोदर बरेच



दिवस अपूर्ण ठेवण्यात आला त्यानंतर गिट्टी टाकून सुद्धा बरेच दिवस नागरिकांना त्रास होत होता आता त्या रस्त्याला थोडेसे मुरुम टाकून दबाई केले होते परंतु परत अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने रस्ता तर खराब झालाच आहे परंतु नाली काम न झाल्यामुळे पावसाचे पाणी सर्व घाण वाहून रस्त्यावर येऊन पडत आहे त्यात नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, संपूर्ण घाण रस्त्यावर आल्यामुळे तेथून चालणे सुद्धा कठीण जात आहे. एवढी मोठी नगरपरिषद आणि कर्मचारी आणि स्वच्छता करण्यासाठी आलेला निधी कुठे खर्च होत आहे याची चौकशी सुद्धा झाली पाहिजे. फक्त कागदोपत्री स्वच्छता करणे, कर्मचारी कोण कुठे काम करतात, त्यावर किती खर्च करण्यात येत आहे याची विचारणा करणारे कोणीही नगरसेवक किंवा राजकीय पुढारी नाहीत, असले तरी त्यांचा दबदबा नगरपरिषद च्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर राहिला नाही असेच चित्र दिसून येत आहे. आता येणारे दिवस पावसाळ्याचे आहेत म्हणून नगरपरिषद ने स्वतः सर्व शहरातील नाले सफाई करून पावसाळ्याचे पाणी साठून घाणीचे साम्राज्य पसरणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. तरी बोंद्रे निवास ते टीपू सुल्तान चौक येथील रस्त्यावर वारंवार वाहून येणारे घाण पाणी आणि कचरा व नाली तसेच रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशी नागरिकांची मागणी आहे तरी यावर लवकरात लवकर उपाय योजना करण्यात यावी अन्यथा यापुढे जर असे झाल्यास येथील जमा होणारा घाण कचरा नगरपरिषद च्या आवारात आणून टाकण्यात येईल अशी भूमिका संतप्त झालेल्या नागरिकांनी घेतली आहे. तरी यावर नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक नेते कार्यकर्ते नागरिकांच्या या समस्येविषयी काय भूमिका घेतात याकडे सर्वाचे लक्ष लागून राहिले आहे.

# पालघर मतदार संघामध्ये उमेदवारांना चिन्हाचे वाटप

**पालघर/प्रतिनिधी**

२२-पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघातील लोकसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद बोडके, निवडणूक निरीक्षक (सामान्य) अजय सिंग तोमर, अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) संजिव जाधवर, तहसिलदार सचिन भालेराव यांच्या उपस्थितित चिन्हाचे वाटप करण्यात आले. निवडणूक रिंगणात असलेले उमेदवार, त्यांचा पक्ष आणि चिन्ह पुढीलप्रमाणे : भरत सामजी वनगा, बहुजन समाज पार्टी, चिन्ह (हत्ती), भारती भरत कामडी, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), चिन्ह (मशाल), डॉ. हेमंत विष्णू सवरा, भारतीय




जनता पार्टी, चिन्ह (कमळ), राजेश रघुनाथ पाटील, बहुजन विकास आघाडी, चिन्ह (शिट्टी), मोहन बारकू गुहे, भारत आदिवासी पार्टी, चिन्ह (हॉकी आणि बॉल), कॉम्रेड राहुल मेढा, मार्क्सिस्ट लेनिनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (रेड फ्लॅग), चिन्ह (बॅट), विजया राजकुमार म्हात्रे, वंचित बहुजन आघाडी, चिन्ह (गॅस सिलेंडर), अमर किसन कवळे, अपक्ष, चिन्ह (बॅटरी टॉर्च), दिनकर दत्तात्रय वाढाण, अपक्ष, चिन्ह, (विहीर), मीना किशोर भड, अपक्ष, चिन्ह, (खाट) अशा चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची आज वसईत जाहीर प्रचार सभा!

**वसई/प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित शाह यांची सोमवार दि. १३ मे रोजी सकाळी ११.३० वाजता वसई पश्चिमेला सनसिटी येथील भव्य पटांगणात जाहीर प्रचार सभा होत आहे. महायुतीचे पालघर लोकसभेचे उमेदवार डॉ. हेमंत सवरा यांच्या प्रचारासाठी ते वसईत येत आहेत. यामुळे वसई विरारसह पालघर जिल्हा भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. वसईत अमित शाह काय बोलणार याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाचे वसई विरार जिल्हा प्रसिद्धी प्रमुख मनोज बारोट म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमित शाह यांना केंद्रीय गृहखात्याची जबाबदारी सोपवल्यामुळे अमित शाह यांनी प्रथम देशाच्या सुरक्षेला प्राधान्य दिले. देशाच्या सुरक्षेचा विचार करताना त्यांनी



जल, थल आणि वायू सेनेला स्वायत्तता दिली. ब्रिटिश काळात जे कायदे बनवण्यात आले होते ते शिक्षा करण्यासाठी होते. मात्र आता मोदी सरकारने त्या जुन्या जर्जर झालेल्या कायद्यात अमुलाग्र बदल केले आहेत. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी त्यात मोठे सुधार करण्यात आले आहेत. तसेच काँग्रेसने ३७० कलम लागू करून जम्मू काश्मीरला वेगळे ठेवून भारताचे तुकडे करण्याचे काम मागील ७० वर्ष केले होते. त्यामुळे अखंड भारताच्या निर्मितीसाठी कलम ३७० हटवण्याचे भाजपाने आपल्या संकल्प पत्रात जाहीर केला होता. यावर विरोधकांनी म्हटले होते की, जर ३७० कलम हटवण्याचे विचार मोदी सरकारने केले तर देशात रक्ताचे पाट वाहतील, अशी वल्गना करत देशातील वातावरण दूषित करणाऱ्यांना केंद्रातील भाजपप्रणीत मोदी सरकारने ३७० कलम हटवून चपराक लावत वचनपूर्ती केलेली आहे. त्यामुळेच अखंड भारताचे स्वप्न साकार झाले आहे. त्याचप्रमाणे मुस्लिम महिलांना तीन तलाक सारख्या कु-प्रथेतून मुक्ती देण्यासह देश हिताचे अनेक निर्णय मोदी सरकारने घेतले, त्यात अमित शाह यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. असे व्यक्तिमत्त्व हे वसई येथे महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारसाठी येत आहेत असेही मनोज बारोट यांनी माध्यमांना सांगितले.

# श्री सदानंद महाराज आश्रमात भव्य श्री विष्णू याग यज्ञ सोहळ्याचे आयोजन

**वसई/प्रतिनिधी**

तुंगारेश्वर पर्वतराजीतील तीर्थक्षेत्र परशुराम कुंड येथील संत श्री बालयोगी सदानंद महाराज यांच्या आश्रमात यंदाही बालयोगी सदानंद महाराज यांच्या तुंगारेश्वर पर्वतावरील आगमन दिनानिमित्ताने श्री विष्णू याग सोहळा आणि श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली आहे. सद्गुरु नित्यानंद स्वामींच्या कृपाप्रसादाने वैशाख शुद्ध पंचमी ते सप्तमी म्हणजे तारीख १२ ते १४ मे पर्यंत तीन दिवस हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा विष्णू याग सोहळा चालणार आहे. विष्णू याग सोहळा आणि सत्यनारायण महापूजा उत्सवाचे यंदाचे ५३वे वर्ष असून संपूर्ण सोहळा बालयोगी सदानंद महाराज यांच्या शुभहस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. श्री विष्णू याग सोहळ्यास १२ मे रोजी प्रारंभ होणार असून तारीख १४ मे रोजी श्री विष्णू या सोहळ्याची




पूर्णाहुती होणार असून त्यानंतर सत्यनारायणाची महापूजाही संपन्न होणार आहे. बालयोगी सदानंद महाराजांच्या आश्रमात श्रीविष्णूयाग सोहळ्यानिमित्ताने तारीख १३ आणि १४ मे दरम्यान मोफत वनौषधी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. संत श्री बालयोगी सदानंद महाराज यांनी १९७१ साली राई गाव (भाईंदर पश्चिम) येथील आपल्या घरादाराच्या त्याग केल्यानंतर तुंगारेश्वर पर्वतावर सदानंद बाबांचे आगमन झाले. त्या आगमन दिनाच्या निमित्ताने प्रतिवर्षी बालयोगी सदानंद महाराजांच्या आश्रमात श्री विष्णू याग यज्ञ सोहळा आयोजित केला जातो. मंगळवार, ता. १४ मे श्री विष्णू याग सोहळ्याचा महत्त्वपूर्ण दिवस असून सकाळी हवन, श्री सत्यनारायणाची महापूजा, श्री विष्णू याग पूर्णाहुती, दुपारी महाआरती, महाप्रसाद (भंडारा), श्री जनार्दन प्रासादिक भजन मंडळ बोळिंज, विरार आणि भजनरत्न महादेव बुवा शहाबाजकर (नवी मुंबई) तसेच हनुमान प्रसादिक भजन मंडळ नवाळे... निर्मळ वसई यांच्या भजनाचा कार्यक्रम तसेच सायंकाळी ह.भ.प. विश्वनाथ महाराज वारिंगे (अंबरनाथ) यांची कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. सोबत माऊली हरिपाठ मंडळ वडवली.. भिवंडी यांच्या सुस्वर हरिपाठचा कार्यक्रमही होणार आहे. बालयोगी सदानंद महाराज आश्रम संस्थेच्या विश्वस्त मंडळाने भाविकांनी मोठ्या संख्येने श्री विष्णू या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

# कुंदे शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले आभासी वास्तव्याचे जग



**वाडा/प्रतिनिधी**

कुंदे येथील जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनी स्मार्ट गाव संकल्पनेचे संस्थापक योगेश साहू यांनी से मेटा द्वारे जिओ ग्लासच्या माध्यमातून आभासी वास्तव्याचे जग अनुभवले यावेळी आपण एका वेगळ्या दुनियेत वावरत आहोत असा आपल्याला अनुभव मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कुंदे गाव हे स्मार्ट गाव करण्याच्या उद्देशाने स्मार्ट गाव ही संस्था या ठिकाणी शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी अश्या कित्येक विषयांवर काम करीत आहे. याचाच एक भाग म्हणून येथील जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठी सदर कार्यशाळा से मेटाचे संस्थापक सुमित सोनी, जर्मनी येथील वरिष्ठ सल्लागार अभिषेक व्यास, रोटरी क्लब कांदिवली, जिओ ग्लासचे अमित अंबास्थ यांच्या माध्यमातून आयोजित केली होती. यावेळी प्रत्यक्ष कार्यशाळेत शाळेतील इयत्ता सहावी ते आठवीच्या तीस विद्यार्थ्यांना जिओ गॉगलचा वापर करून सूर्यमाला व शरीराच्या आतील भाग पाहण्याचा अनुभव दिला. हा अनुभव घेताना सर्व विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य शिक्षकांना जिओ गॉगल चा वापर करून ३६० डिग्री व्हिडिओच्या माध्यमातून आभासी वास्तव्य बाबत विद्यार्थ्यांना कसे शिक्षण देता येईल याचे प्रशिक्षण दिले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील, सरपंच प्रमोद बरफ, मुख्याध्यापक रमेश पाटील, विश्वनाथ जाधव, रेवंता आगीवले, मनीषा धनगर, वैशाली धनगर आदी उपस्थित होते. तर या प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थी, शिक्षक यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आणि से मेटा आणि स्मार्ट गाव यांनी विद्यार्थ्यांना भविष्य वेधी शिक्षणाकडे जाण्यासाठी केलेले प्रामाणिक प्रयत्न यासाठी शाळा आणि व्यवस्थापन समितीकडून आभार व्यक्त केले.

# ६५ घरफोड्या करणारा सराईत चोरटा अखेर माणिकपूर पोलिसांच्या ताब्यात



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरारसह मुंबई आणि ठाणे परिसरात चोऱ्या करणाऱ्या एका अवलिया चोरास माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. या चोराने तब्बल ६५ घरफोड्या केल्याचे उघडकीस आले आहे. गेल्या काही दिवसांपासून वसई विरार शहरात घरफोड्यांचे प्रमाण वाढले होते. वसईच्या शास्त्रीनगर येथील एका घरफोडीचा तपास माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक करत होते. या वेळी सीसीटीव्ही तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माग काढत आतिष साखरकर (३६) याला अटक केली आहे. त्याच्याकडून घरफोडीमधील १२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मागील काही वर्षांपासून तो चोऱ्या करत आहे. त्याने यापूर्वी ५७ चोऱ्या केल्या होत्या तर त्याच्या अटकेनंतर वसईतील माणिकपूर, मुंबईतील एमएचबी, विलेपार्ले, जुहू आणि गुजराथ मधील उमरगाव पोलीस ठाण्यातील ५ चोऱ्या उघडकीस आल्या आहेत. आतापर्यंत त्याने एकूण ६५ चोऱ्या केल्याचे उघडकीस आल्याची ...पान ६ वर

# भिवंडीत कंपनीच्या केमिकल त्रासाला कंटाळून खोणी ग्रामस्थांचा निवडणुकीवर बहिष्काराचा निर्णय




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरालगतच्या खोणी ग्रामपंचायत हद्दीतील एका अनधिकृत कंपनी मधील केमिकलच्या उग्र वासाने त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्काराचा निर्णय जाहीर केल्या नंतर खडबडून जागे झालेल्या तहसील प्रशासनाने तातडीने ग्रामस्थां सह महसूल, प्रदूषण नियंत्रण मंडळ, पंचायत समिती, एमएमआरडीए व पोलिस अधिकाऱ्यां सोबत बैठक घेऊन तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. खोणी ग्रामपंचायत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कपड्यावर रंग प्रक्रिया करणाऱ्या डाईंग कंपन्या वसलेल्या आहेत. त्याच परिसरात एक केमिकल कंपनी सुरू असून त्याठिकाणी केमिकल प्रक्रिया केली जाते त्यामुळे या संपूर्ण परिसरात उग्र वास पसरत असल्याने नागरिकांना श्वसनाच्या व घशाचा त्रास होऊन डोळे चुरचुरणे असे प्रकार नित्याचे झाले आहेत. मागील चार वर्षांपासून स्थानिक ग्रामस्थ या कंपनीवर कारवाई करावी अशी मागणी तहसीलदार, जिल्हाधिकारी, पंचायत समिती, प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्या कडे करून ही कोणतीही कारवाई होत नसल्याने हवालदिल झालेल्या ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता अशी माहिती ग्रामस्थ अरुण पाटील यांनी दिली.या निर्णयाची दखल तात्काळ तहसीलदार अभिजित खोले यांनी घेतली व सोमवारी सायंकाळी त्यांच्या नेतृत्वा खाली प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, एमएमआरडीए, ग्रामपंचायत व पोलिस अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन तात्काळ कंपनी वर कारवाईचे निर्देश तहसीलदार अभिजित खोले यांनी दिले. या निर्णयाचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.